मंगळवार, 30 ऑगस्ट 2022
किंमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 02 अंक - 32
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

●MARATHI ●DAINIK ●AURANGABAD (MAHARASHTRA) ●TUESDAY 30 AUGUST 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-32 ●TITLE CODE : MAHMAR51117 ●PAGE-10 ●PRICE-5

## चर्चेतली बातमी

### देशात उभारणार जगातील सर्वात मोठे ५ जी नेटवर्क



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** देशातील सर्वात मोठी कंपनी असलेल्या रिलायन्सच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये फाइव्ह जीसंदर्भात मोठी घोषणा करण्यात आली आहे. या सभेमध्ये आपल्या भाषणात रिलायन्स समुहाचे प्रमुख मुकेश अंबानी यांनी जगभरातील गुंतवणुकदारांचे लक्ष लागलेल्या भाषणामध्ये ही घोषणा केली. रिलायन्सची सर्वसाधारण सभा दुपारी दोन वाजता सुरू झाली. मुकेश अंबानी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सभेला संबोधित करताना फाइव्ह जीमध्ये दोन लाख कोटींची गुंतवणूक करणार असल्याची घोषणा केली. तसेच जीओचे फाइव्ह जी नेटवर्क हे जगातील सर्वात मोठे फाइव्ह जी नेटवर्क असेल असेही यावेळेस मुकेश अंबानी यांनी म्हटले आहे. मुकेश अंबानींनी जिओ फाइव्ह जीची घोषणा करताना, मला या ठिकाणी एक घोषणा करायची आहे. जीओच्या वाटचालीमधील हा पुढील टप्पा असून डिजीटल कनेक्टेव्हीटी खास करुन फिक्स ब्रॉडबॅण्डच्या क्षेत्रातील हे महत्वाचे पाऊल आहे, ज्याचे नाव आहे जीओ फाइव्ह जी. फाइव्ह जीच्या माध्यमातून आपण १०० मिलियन घरांना जोडणार आहेत.

# हे अत्यंत चिंताजनक चित्र

## सत्ताधाऱ्यांच्या बोलण्यात आणि वागण्यात मोठा फरक : पवार

आधुनिक केसरी न्यूज

**ठाणे : बिल्किस बानो प्रकरणातील आरोपींना तुरुंगातून सोडण्यात आले. एवढंच नव्हे तर त्यांचा तुरुंगातून सुटल्यानंतर जाहीर सत्कार करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरून केलेल्या भाषणात स्त्री वर्गाचा सन्मान करण्याची भूमिका मांडली होती. मात्र, त्यानंतर गुजरातमध्ये मोदींच्याच विचाराच्या सरकारने लाजीरवाणे आणि घृणास्पद कृत्य करणाऱ्यांना आरोपींना तुरुंगातून सोडण्याचा निर्णय घेतला. हे अत्यंत चिंताजनक चित्र आहे, अशा शब्दात ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी गुजरातमधील सत्ताधाऱ्यांवर हल्लाबोल केला तर फक्त बोलणे महत्त्वाचे नसून कृती महत्त्वाची असते, अशा शब्दात पंतप्रधान मोदींना टोला लगावला.**

बिल्किस बानोच्या प्रकरणातील दोषींच्या सुटकेवरुन देशभरात निदर्शने होत आहेत. बिल्किस बानोला न्याय मिळावा यासाठी अनेक समाजिक संघटना रस्त्यावर उतरल्या. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षानेही देखील बिल्किस बानोला न्याय मिळावा म्हणून राज्यभर मूकनिदर्शने केली. आज शरद पवार यांनी ठाणे शहरात पत्रकार परिषद घेऊन केंद्र सरकारवर घणाघाती हल्ला चढवला. बिल्किस बानो प्रकरणात गुजरात सरकारने घेतलेल्या भूमिकेवर शरद पवार यांनी जोरदार टीका केली. जन्मठेप ही आजन्म असते. पण बिल्किस बानो प्रकरणातील आरोपींना तुरुंगातून सोडण्यात आले. एवढेच नव्हे तर त्यांचा तुरुंगातून सुटल्यानंतर जाहीर सत्कार करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरून केलेल्या भाषणात स्त्री वर्गाचा सन्मान करण्याची भूमिका मांडली होती. मात्र, त्यानंतर गुजरातमध्ये मोदींच्याच विचाराच्या सरकारने लाजीरवाणे आणि घृणास्पद कृत्य करणाऱ्यांना आरोपींना तुरुंगातून



सोडण्याचा निर्णय घेतला. हे अत्यंत चिंताजनक चित्र आहे. अशा अनेक विरोधाभासी गोष्टी या सरकारमध्ये पाहायला मिळतात, असे शरद पवार यांनी म्हटले.

**जनमत तयार करण्यासाठी लढा उभारण्याचा विचार**

'माणसे फोडणे, साधणांचा वापर करणे आणि ईडीसारख्या यंत्रणांचा वापर करून सत्ता मिळवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचं गंभीर चित्र या देशासमोर आज दिसत आहे. त्यामुळे देशातील बिगरभाजप पक्षांच्या नेत्यांशी सुसंवाद साधून लोकशाही मार्गाने आलेली सरकार पाडण्याचे जे कृत्य सुरू आहे त्याविरोधात जनमत तयार करण्यासाठी लढा उभा करण्याचा आम्ही विचार करत आहोत.

### लवकरच काही जिल्ह्यांचा दौरा

माझा प्रयत्न असा राहणार आहे की पक्षातील वरिष्ठ नेत्यांनी जिल्ह्या जिल्ह्यात जाऊन स्थानिक परिस्थितीचा आढावा घ्यावा. अजित पवार यांनी विदर्भाचा दौरा केला. मी देखील काही निवडक जिल्ह्यात जात आहे. त्याची सुरुवात ठाण्यापासून करणार आहे. कारण ठाण्यावर अधिक लक्ष देण्याची गरज आहे, असे सूचक वक्तव्य शरद पवार यांनी ठाण्यातच केले. केंद्रातील भाजप सरकारने याआधी देशवासियांना दिलेली अनेक आश्वासने पूर्ण केली नसल्याचे सांगत आपण लवकरच राज्यातील काही जिल्ह्यांचा दौरा करून आढाव घेणार आहोत, अशी माहिती शरद पवार यांनी दिली आहे.

## महत्त्वाची बातमी

### नासाच्या आर्टेमिस-1 इंजिनमध्ये बिघाड



आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** नासाचे सर्वात शक्तिशाली रॉकेट आज प्रक्षेपित केले जाणार होते. मात्र, ताज्या माहितीनुसार आता हे प्रेक्षेपण काही तांत्रिक बिघाडामुळे पुढे ढकलण्यात आले आहे. याबाबत नासाने आपल्या अधिकृत ट्विटर हँडलवरून याची पुष्टी केली आहे. इंजिन क्रमांक तीनमध्ये बिघाड झाल्याने याचे प्रेक्षेपण पुढे ढकलण्यात आल्याचे सांगितले जात आहे. सोमवारी म्हणजेच आज भारतीय वेळेनुसार संध्याकाळी 6.30 वाजता आर्टेमिस-1 चे प्रेक्षेपण होणार होते. या रॉकेटमधून सुमारे 42 दिवसांच्या मोहिमेवर क्रूशिवाय ओरियन अंतराळ यान प्रक्षेपित करण्याची योजना होती. मात्र, प्रेक्षणापूर्वी नासाच्या केनेडी स्पेस सेंटरमध्ये जोरदार गडगडाटी वादळादरम्यान रॉकेटच्या जवळ असलेल्या लॉन्च पॅड आणि 600-फूट टॉवरवर वीज पडली. त्यामुळे या रॉकेटच्या तीन नंबर इंजिनमध्ये काही तांत्रिक बिघाड निर्माण झाल्याचे समोर आले आहे.

# मला अटक करुन दाखवा

## मुख्यमंत्री ममता बॅनर्जींचे भाजपला आव्हान

आधुनिक केसरी न्यूज

**कोलकात्ता :** पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी तृणमूल काँग्रेस वरील भ्रष्टाचाराच्या आरोपांवरून भाजपवर जोरदार हल्ला चढवला आहे. ममता बॅनर्जी सोमवारी एका रॅलीला संबोधित करताना म्हणाल्या की, निवडून आलेले सरकार पाडण्यासाठी भारतीय जनता पक्षाला पैसे कोठून मिळतात याचे त्यांनी उत्तर द्यावे. निवडून आलेल्या राज्य सरकारांना पाडण्यासाठी काळा पैसा आणि केंद्रीय एजन्सीचा वापर केला जात आहे. त्या पुढे म्हणाल्या की, हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे, आम्ही भ्रष्ट असल्याचे सिद्ध करण्यासाठी न्यायालयात कोणताही पुरावा सादर करू शकले नाही. पण, इकडे मीडिया ट्रायल सुरू असून ते आम्हाला चोर म्हणत आहेत. हे सर्व षडयंत्र आहे, मीडियावर विश्वास ठेवू नका. ते आमच्या नेत्यांच्या मागे लागले आहेत. मी त्यांना आव्हान देते की, हिम्मत असेल तर मला अटक करा. मी तुरुंगातून लढेन आणि जिंकेन. तुम्ही माझ्यावर नियंत्रण ठेवू शकत नाही, अशी टीका ममतांनी केली.

**महाराष्ट्र सरकार पाडण्यासाठी पैसा कुठून आला?**

ममता बॅनर्जी पुढे म्हणाल्या, महाराष्ट्रातील सरकार पाडण्यासाठी तुम्ही किती पैसे खर्च केले, हा पैसा कुठून आला? तुम्ही झारखंडच्या आमदारांना पैसे देऊ केलेत. तुम्हाला झारखंड सरकार तोडायचे होते, मी ते थांबवले. अरविंद केजरीवाल म्हणतात, त्यांच्या आमदारांना पैसे देऊ केले आहेत. हा सगळा पैसा कुठून येत आहे, असा सवालही त्यांनी यावेळी केला.

# बहिष्कार टाकणाऱ्या जातीयवाद्यांवर कारवाईची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** पोळ्यानिमित्त बैल मारुती मंदिराजवळ फिरवण्यावरून झालेल्या वादातून दोन गट समोरासमोर आले. यातून शाब्दिक वाद करत हाणामारी झाल्याची घटना धुळे तालुक्यातील मेहेरगाव गावात शुक्रवारी घडली. याप्रकरणी सोनगीर पोलिसांत शनिवारी फिर्याद दाखल झाल्याने दोन गट मिळून २३ जणांविरोधात गुन्हा दाखल झाला असल्याची माहिती मिळाली आहे. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा होत असताना दलितांवर सार्वजनिक बहिष्कार टाकून जातीयवादी मानसिकता बाळगणाऱ्यांवर कारवाई करा, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे आंबेडकरी चळवळीच्या विविध संघटनेच्या पदाधिकाऱ्यांकडून व मेरगाव येथील दलित समाज बांधवांच्या वतीने करण्यात आली आहे. मेहेरगाव ता.धुळे येथे सण पोळ्याच्या दिवशी जातीयवादी मानसिकता असणाऱ्यांनी दलित तरुणांना अडवून बैल मिरवणुक नेवू नये म्हणून लाठ्या-काठ्यांनी मारहाण केली. आरोपींविरुध्द ॲट्रोसिटी अन्वये गुन्हा दाखल झाला. मात्र एकही आरोपी अटकेत नाही, सवर्ण समाजाने दररोज गांधी चौकात बैठक घेवून पोलिसांवर दबाव टाकून दलित तरुणांवर ३९५ सारखा



गंभीर गुन्हा दाखल करायला भाग पाडले. दलित वसीवर बहिष्कार टाकण्यात आला ही बाब देशाच्या लोकशाहीला मारक आहे. पोलिसांनी जातीयवादी लोकांच्या दबावात येऊन गंभीर गुन्ह्यात तरुणांना अडकून त्यांच आयुष्य बरबाद करण्याचे काम केले आहे. तसेच मेहरगाव गावात दलित समाजावर बहिष्कार टाकण्यात आल्याचा गंभीर आरोपही यावेळी स्थानिक दलित समाजाच्या नागरिकांसह आंबेडकरी चळवळीच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे त्यामुळे या प्रकरणातील संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी संदर्भात आज आंबेडकरी चळवळीचे विविध पदाधिकारी व कार्यकर्ते जिल्हा प्रशासनाला निवेदन देऊन पोलीस अधीक्षक प्रवीण कुमार पाटील यांच्याकडे न्यायाच्या अपेक्षा केली आहे. अचानक झालेल्या हाणामारीमुळे गावात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

# परवानगी मिळो अथवा नाही दसरा मेळावा शिवाजी पार्कवरच

## उद्धव ठाकरे यांची भूमिका; शिवसेनेच्या मेळाव्याला अद्याप प्रशासनाकडून परवानगी नाही

आधुनिक केसरी न्यूज

मुंबई : शिवसेनेच्या दसरा मेळाव्याला अद्याप प्रशासनाकडून परवानगी देण्यात आलेली नाही. पण यामुळे राज्यातील राजकारण मात्र चांगलेच तापले आहे. हा सोहळा शिंदे गटाकडून हायजॅक करण्यात येणार असल्याच्याही चर्चा सुरु आहेत. यापार्श्वभूमीवर परवानगी मिळो अथवा न मिळो शिवसेनेचा दसरा मेळावा शिवाजी पार्कवरच होणार, अशी भूमिका शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी घेतली आहे.

उद्धव ठाकरे म्हणाले, शिवसैनिकांनी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून दसऱ्याला शिवतीर्थावर येण्यास सुरुवात केली आहे. महापालिकेने अद्याप परवानगी दिलेली नाही हा तांत्रिक-मांत्रिक भाग असेल तो ते बघून घेतील. पण शिवसेनेचा दसरा मेळावा शिवतीर्थावरच होणार. दसरा मेळावा कुणाचा होणार यावरुन कोणताही संभ्रम नाही. संभ्रम निर्माण करणाऱ्यांनी तो खुशाल करावा. शिवसेनेचा दसरा मेळावा शिवतीर्थावरच



होणार. राज्यातील तमाम शिवसैनिकांनी दसरा मेळाव्याला येण्याची तयारी सुरु केली आहे. महापालिकेची परवानगी हा तांत्रिक मांत्रिक भाग.. ते नंतर बघू, पण आमचा दसरा मेळावा शिवाजी पार्कावरच होणार, असे उद्धव ठाकरे यांनी सांगितले. विश्व हिंदू परिषदेचे नेते उद्धव कदम यांनी आज शिवसेनेत प्रवेश केला. यावेळी उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत त्यांनी भाजप आणि शिंदे गटावर जोरदार हल्लाबोल केला.

**शिवतीर्थावरच मेळावा घ्यावा असे काही नाही : केसरकर**


या मुद्द्यावरुन शिंदे गटाचे प्रवक्ते दिपक केसरकर म्हणाले, महाराष्ट्रात यावरुन कुठलेही मतभेद व्हावेत असा हेतू नाही. पण मेळावा घ्यायचाच असेल तर तो शिवतीर्थावरच व्हावा असे काही नाही. शेवटी दसरा मेळावा ही शिवसेनेची परंपरा आहे. परंतू हा मेळावा स्वतः एकनाथ शिंदेंनी घ्यावा की नाही याबाबत शिंदेच यावर योग्यवेळी बोलतील. पण सध्यातरी अशी काही चर्चा झालेली नाही. मी ज्यावेळी काही बोलतो तर मुख्यमंत्र्यांशी बोलल्यानंतरच बोलतो, त्यामुळे यावरुन वाद निर्माण करण्याचा त्यांचा काही हेतू नाही.

**गणेशोत्सवानंतरच होणार निर्णय**

दरम्यान, शिवसेनेच्या दसरा मेळाव्यावर गणेशोत्सवानंतरच निर्णय घेण्यात येईल अशी माहिती पालिकेच्या सहाय्यक आयुक्तांनी दिली आहे. शिवसेनेने दसरा मेळाव्यासाठी शिवाजीपार्कमधील परवानगीसाठी दोनदा परवानगीसाठी पत्र दिले पण अद्यापही महापालिकेने याबाबत निर्णय स्थगित ठेवला आहे. सध्या सर्व स्टाफ गणेशोत्सवाच्या तयारीत व्यस्त असल्याने हा निर्णय प्रलंबित ठेवला असल्याचे पालिकेकडून सांगण्यात आले आहे.

### कंबर कसली; हिंगोलीचा किल्ला बांधायला घेतला

ज्या संतोष बांगरांच्या निष्ठेचे कौतुक झाले, त्याच संतोष बांगराच्या दलबदलूपणाचीही राज्यात चर्चा झाली. २४ तासांआधी ठाकरेंसाठी अश्रू ढाळणाऱ्या संतोष बांगरांनी ऐनवेळी एकनाथ शिंदे गटात प्रवेश करुन राजकारणात विश्वास वगैरे काही नसतो, हे महिनाभरापूर्वी दाखवून दिले. बांगरांचा शिंदे गटातला प्रवेश ठाकरेंच्या चांगलाच जिव्हारी लागला होता. काहीही करुन बांगरांना अस्मान दाखवायचंच, असा निर्धारच ठाकरेंनी केला होता. आज त्याच दिशेने पहिले पाऊल पडलं आहे. मागील निवडणुकीतील बांगर यांचे दोन कट्टर प्रतिस्पर्धी संतोष टारफे आणि अजित मगर यांना पक्षात घेऊन उद्धव ठाकरे यांनी मास्टरस्ट्रोक मारला आहे. कळमनुरी विधानसभा मतदारसंघात मागच्या वेळी काँग्रेसचे उमेदवार म्हणून संतोष टारफे तर वंचित बहुजन आघाडी कडून अजित मगर हे रिंगणात होते.




# जहाँ डाल डाल पर...

आधुनिक केसरी

भारतीय मूर्तिकारांना हजारो वर्षांपूर्वी धातुशास्त्र ज्ञात होतं याचे पुरावे प्राचीन काळातील अनेक मूर्ती आजही देतात. आजच्या विज्ञानाला जे धातुशात्र गेल्या शे दीडशे वर्षात ज्ञात झालं आहे त्याचं सखोल ज्ञान आमच्या पूर्वजांपाशी होतं. आज विविध सिमेंट कंपन्यांच्या मजबुतीचा दावा करणाऱ्या अनेक जाहिराती आपण पाहतो पण त्यांचा वापर करून बांधलेल्या अनेक इमारती शंभर वर्षेही मोठया मुश्किलीने टिकतात. काही तर काही वर्षातच पत्त्याच्या बंगल्यासारख्या कोसळतात. पण आमची शेकडो, हजारो वर्षांपूर्वी बांधलेली देवालये मात्र आजही दिमाखात उभी आहेत. सिमेंट, चुना आदींचा वापर न करता केवळ दगडांवर दगड ठेवून मंदिरे बांधण्याची कला ' हेमाडपंती ' म्हणून प्रसिद्ध आहे. हेमाडपंथी नव्हे तर हेमाडपंती. कारण हेमाद्री पंडित किंवा हेमाडपंत हा यादवांचा प्रधान होता. त्याने ही कला विकसित केली. दगड विशिष्ट कोनात कापणे, त्याला खाचा किंवा खुंट्या ठेवून एकमेकात अडकवणे ( लॉक करणे ) यामुळे ही मंदिरे वर्षानुवर्षे टिकून राहिली. वेरूळचे घृष्णेश्वर मंदिर, त्रंबकेश्वराचे मंदिर, चाळीसगावजवळील पाटणादेवी येथील मंदिर अशी अनेक मंदिरे आणि अनेक लहानमोठ्या गावांमध्ये अशी पुरातन मंदिरे उभी असलेली आपल्याला दिसतील.

प्राचीन भारतावर विविध आक्रमकांच्या स्वाऱ्या झाल्या. पण भारतात असलेल्या मंदिर आणि मठांनी आपला इतिहास, परंपरा सांभाळून ठेवण्याचे आणि तो पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवण्याचे अमूल्य काम केले. शंकराचार्य आदींनी स्थापन केलेले मठ, समर्थ रामदासांनी स्थापन केलेले आणि पुढे त्यांच्या शिष्य, महंतांनी जपलेले त्यांचे मठ यांनी याबाबतीत मोठेच काम केले आहे. अजूनही ते काम अव्याहतपणे तसेच सुरु आहे. काळ बदलला, युगे बदलली. आक्रमणाची अनेक वादळे आली. या सगळ्यांना तोंड देऊन मंदिरे, मठ यांनी भारतीय इतिहास, धर्म, परंपरा जागृत ठेवली. अनेक ऋषीमुनींच्या आश्रमांनी समृद्ध गुरुकुल परंपरा जपली, पुढे नेली. त्यातून समाजाप्रती आपल्या कर्तव्याप्रती सजग असणाऱ्या पिढ्या घडवल्या. श्रीराम, श्रीकृष्ण अशाच गुरुकुलातून वाढले. ज्या ज्या वेळी भारतातील चैतन्य, अस्मिता क्षीण झालेले दिसले त्या त्या वेळी भारतातील संत, ऋषी मुनी यांनी आमची अस्मिता जागृत करण्याचा प्रयत्न केला. मग ते शंकराचार्य असतील, संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत तुकाराम, संत रामदास किंवा आणखी इतर संत असतील. या सगळ्यांनी आम्हाला केवळ देव देव न करता आमच्या कर्तव्याची, पुरुषार्थाची जाणीव करून दिली. म्हणूनच एवढी आक्रमणे होऊनही भारतीय संस्कृती टिकून आहे.

(क्रमशः)



## आनंदी पहाट

# नकारात्मक विचार नैराश्याचे लक्षण

आधुनिक केसरी

नकारात्मक विचारांची भिन्नविभिन्न कारणे असतात. अनाहूत नकारात्मक विचार हे ऑब्सेसिव्ह-कंपल्सिव डिसऑर्डर, सामान्यीकृत चिंता विकार किंवा इतर मानसिक आरोग्य स्थितीचे लक्षण असू शकतात. नकारात्मक विचार हे देखील नैराश्याचे लक्षण आहे. अतिविचार हा स्वतःहून निर्माण केला जाणारा केवळ मानसिक विकार नाही. ते सहसा इतर मानसिक आरोग्य स्थितींशी संबंधित असते. नैराश्य, चिंता विकार, आजारपण चिंता विकार, ज्याला काहीवेळा हायपोकॉन्ड्रियासिस किंवा आरोग्य चिंता म्हणतात, आपण गंभीरपणे आजारी आहात किंवा होऊ शकता याची जास्त काळजी करत बसण्याने देखील नैराश्य आणि नकारात्मकता बळावते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

त्याबाबतीत तुम्हाला कोणतीही शारीरिक लक्षणे नसतील, अतिविचार हा स्वतःचा मानसिक आजार नसला तरी देखील तो नैराश्य, चिंता, खाण्याचे विकार आणि पदार्थांच्या वापरातील विकार यासारख्या परिस्थितींशी संबंधित असू शकतो. तीव्र वेदना आणि जुनाट आजार असलेल्या लोकांमध्ये रुमिनेशन सामान्य असू शकते, त्या वेदनांबद्दल नकारात्मक विचारांचे रूप धारण करणे आणि त्यातून बरे होणे हे देखील शक्य होऊ शकते.

सामान्यांमध्ये तणावग्रस्ततेमुळे डोकेदुखी, मायग्रेन, सायनसवर परिणाम करणारी परिस्थिती आणि कानाचे संक्रमण यांचा समावेश होतो. असामान्य किंवा गंभीर डोकेदुखी, रक्तदाब हे कधीकधी गंभीर वैद्यकीय स्थितीचे लक्षण असते.

अर्थात या अशा प्रकारच्या समस्या दुर्मिळ आहेत. मेंदूतील रासायनिक बदल हा पोषक तत्वांची कमतरता, झोपेचा विकार, साखरेच्या अतिसेवनामुळे बॅक्टेरियांची वाढ, नैराश्य किंवा थायरॉईडच्या स्थितीचे लक्षण असू शकतात. इतर सामान्य मेंदूच्या रासायनिक बदलांच्या कारणांमध्ये खूप वेळा खाणे, निष्क्रियता, पुरेशी झोप न मिळणे, दीर्घकाळचा ताण आणि खराब आहार यांचा समावेश होतो.



आधुनिक केसरी

## दिसे विटेवरी | आत्मरूप ||

मनीचे तरंग | आत्ममग्न व्हावे ||
अंतरी रूजावे शांतीब्रह्म ||१||

एकांती घडावा | आत्म्याशी संवाद ||
आणिकांशी वाद | नको जीवा ||२||

तुटता तुटेना | पाश विकारांचा ||
त्यात संसाराचा | घोळ सारा ||३||

पिढीजात दुःख | जहागिरी माझी ||
काळा भीती तुझी | कैसी सांग ||४||

एकतारी गुंजे | देहाच्या गाभारी ||
दिसे विटेवरी | आत्मरूप ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# समाधान ही परमेश्वराची खरी देणगी



आधुनिक केसरी

प्रत्येकाला असे वाटते की, मी कुणाची निंदा करीत नाही, धर्माने वागतो, तरी मी दुःखी, आणि वाईट माणसे सुखात वावरताना दिसतात, हे कसे काय? अगदी कितीही सात्विक मनुष्य असला, तरी त्याच्या हे मनात आल्यावाचून रहात नाही. नामाचा विटाळ ज्याने मानला तो सुखी दिसावा, आणि नाम ज्याने कंठी धरले त्याला दुःख व्हावे, यावरून भगवंताला न्यायी कसे म्हणावे, अशीही पुष्कळांना शंका येते. खरोखर, याचे मर्म जर आपण पाहिले तर आपल्याला असे आढळून येईल की, बाहेरून जे सुखी दिसतात ते अंतर्यामी दुःखात बुडलेले असतात. विषय त्यांना पुष्कळ मिळाले, पण त्यामुळे मनाची शांती लाभली तर उपयोग! दोन रस्ते लागले, त्यातला एक चांगला दिसला पण तो आपल्या गावाला नेणारा नव्हता, आणि दुसरा खडकाळ आणि काट्याकुट्यांचा होता पण तो आपल्या गावाला नेणारा होता; तर कोणता रस्ता आपण धरायचा ? भगवंताकडे जाणाऱ्या लोकांचे गीतेमधे दोन वर्ग सांगितले आहेत; एक सांख्यमार्गी आणि दुसरे कर्मयोगी. ज्यांची स्वभावतःच वासना कमी असून ज्यांचा इंद्रियांवर ताबा चालतो, जे जन्मापासून तयार असतात, ते सांख्यमार्गी होत. ज्यांच्या वासना पुष्कळ असून जे इंद्रियाधीन असतात, पण ज्यांना भगवंत असावा असेही वाटते, म्हणजे आपल्यासारखे सामान्य जन, ते कर्मयोगी होत. सांख्यांचा साधनमार्ग अर्थात सूक्ष्म आणि उच्च प्रतीचा असतो; आपला मार्ग जड, सोपा आणि सुखकारक असतो. सांख्य हा भगवंताकडे चट्दिशी पोहोचतो, पण आपण क्रमाक्रमाने जातो. सामान्य माणसाचा मग मार्ग कोणता ? तो मार्ग असा - वासना आहे तोपर्यंत योग्य मार्गाने ती तृप्त करण्याचा प्रयत्न करावा, पण सृष्टीमधल्या सर्व घडामोडी ईश्वराच्या सत्तेने घडत असल्यामुळे आपल्या प्रयत्नांचे फळ ईश्वरावर अवलंबून आहे, हे ध्यानात बाळगून समाधान ठेवावे. दहा माणसांना त्यांच्या असमाधानाचे कारण विचारले तर ती माणसे दहा निरनिराळी कारणे सांगतील. यावरून असे दिसते की जगातील कोणतीही वस्तू समाधान देणारी नाही. समाधानाचे शास्त्र निराळेच आहे. ते प्रपंचापासून शिकता येत नाही. ज्याच्याजवळ अगदी थोडे आहे त्याच्यापासून, तो ज्याच्याजवळ अगदी पुष्कळ आहे त्याच्यापर्यंत, प्रत्येकाला काही तरी कमी असणारच. पण मजा अशी की प्रत्येकाची समजूत मात्र अशी असते की, आपल्याजवळ जे कमी आहे त्यामध्ये समाधान आहे; म्हणून त्याचे दुःख कायम राहते. भगवंतावाचून असणारे वैभव आणि ऐश्वर्य हे कधीच सुखसमाधान देऊ शकत नाहीत. समाधान ही परमेश्वराची खरी देणगी आहे, ती मिळवण्याचा उपाय म्हणजे भगवंताचे स्मरण होय.

**- श्री सद्गुरु ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

# मंगलमयतेची अनुभूती देणारी श्री सत्यनारायण महापूजा

आधुनिक केसरी न्यूज

श्रावण...! सणासमारंभाचा राजा...!! अनेक कारणांमुळे, उदाहरणार्थ श्रावणातला भुरळ घालत पिंगा घालायला लावणारा लाजरा साजरा सप्तरंगी निसर्ग, सारं काही मंगलमय करणारे सणासमारंभ. आणि सर्वांना मंगलमयतेची अनुभूती देणारी श्री सत्यनारायणाची पूजा. आमचे शेतकरी कुटुंब तसे श्रद्धाळू. देवादिकांना माणणारे. पण अंधश्रध्दाळू मात्र नक्कीच नसणारे. पंढरीच्या पांडुरंगावर मनस्वी श्रद्धा. वर्षातील आषाढी, कार्तिकी, माघी आणि चैत्री वारी शक्यतो न चुकवणारे. यात आठ दहा दिवस न घालवता वारीच्या आदल्या दिवशी नेहमीप्रमाणे दिवसभर शेतात काम करुन रात्री वाळेखिंडी अर्थात जतरोड रेल्वे स्टेशन वरून जावून दुसऱ्या दिवशी सकाळी सकाळी चंद्रभागेतिरी अंघोळ करून माळ बुक्का, वाहून नामदेव पायरी पासून विठ्ठलाचे मुख दर्शन झाले की विठ्ठलाचा लाह्या, चुरमुरे, बत्तासे असलेला प्लास्टिकच्या बंद पिशवीतील प्रसाद, इभतीचा चौरस आकाराचा माला, घरातील आम्हा बारक्यांना एखादी नक्षीची टोपी, चड्डी, एखादे खेळणे, बहीणीसाठी भिंगाचे चुडे, घरच्या स्त्रीयांना लाखेचे चुडे, कुंकू वगैरे आणि अगदी आठवणीने बैलांना गोंडे, दावी, कधी झुली घेऊन लगेच परत येऊन आपल्या शेतकामात गढून जात. पितळेच्या घुंगरांचे चाळही आणलेले



होते. वडिलांनी सुद्धा ही परंपरा जपलेली होती. आजही हा नेम दिवसमानानुसार कमी अधिक प्रमाणात का होईना पण आमच्या कडे सुरु आहे. सर्वांचीच विठू चरणी श्रद्धा आहे. आजही पूर्वी प्रमाणेच दर पंधरा दिवसांची एकादशी मात्र चुकत नाही. कुटुंबातील एक जेष्ठ व्यक्ती एकादशी करते. असो.

आमच्याकडे आजोबा व वडिलांच्या हयातीत सत्यनारायण पूजा नेहमी व्हायची. आजही होते पण पूर्वीसारखे सातत्य नाही. त्या दिवशीचा म्हणजे शक्यतो सोमवारचा उत्साह आणि लगबग काही वेगळीच असायची. वातावरणात पावित्र्य ओसंडून वहात असल्याचा अनुभव यायचा. सकाळपासूनच घरात स्वच्छता सुरु व्हायची. घर-दार सारवून, कपडे धुवून, भांडी घासून पुसून घ्यायची घरातल्या महिलांची घाई चाललेली असायची. पण कुठेही आदळ आपट, कामाची नाराजी नसायची. लहान थोरांसकट साऱ्यांनी डोक्यावरून अंघोळ करायची. रोजचेच धुतलेले कपडे; पण आज एकदम फ्रेश आणि हलके हलके, पवित्र वाटायचे. सारे कसे हसत खेळत उत्साहाने सुरु असायचे. पूजेच्या प्रसादाचा मुख्य मेनू म्हणजे भरडलेल्या गव्हाची खीर. त्यासाठी घरातला मोठा तांब्याचा हंडा घासून पुसून लख्ख करुन उन्हात वाळायला ठेवला जायचा. सोन्यासारखा चमकायचा. त्यावर दोन तीन पिढ्यांपूर्वीच्या पुर्वजांचे नांव कोरलेले आहे. खीर वैयरताना व शिजवताना हलवण्यासाठी मोठी लाकडाची पळीही स्वच्छ धुवून तिथेच ठेवलेली असायची. 'डाव' म्हणतात तिला. चाटूही म्हणतात. दहा वाजण्याच्या सुमारास आमचा काका ( मावशीचा नवरा ) शेगावपासून दोन अडीच किमी अंतरावर असलेल्या आणि वृक्षराजीनी निसर्गरम्य वातावरणातील बनशंकरी देवीच्या वास्तव्याने पुनित झालेल्या बनाळीहून केळीची खुटं घेऊन यायचा. तिथे केळीच्या बागा खूप असायच्या. इतर फळांचीही लागवड केली जायची. सोमवारी बाजारात बनाळीहून विक्रीसाठी शेतकरी फळे व इतर वस्तूही घेऊन येत. असो. तर काका सोबत पिशवीत पाऊस पांघरलेली ताजी टवटवीत नाजूक फुलं, चार दोन डाळींबाची, सिताफळाची कच्ची फळं, फुलकळ्या, केळी, बेलाची पानं, बेलफळं एखादं वगैरे साहित्य असायचं. मस्त सुगंध यायचा. ती केळीची मोठी हिरवीगर्द पोपटी पानं बघून, त्यांच्या सुगंधानं मन भरुन जायचं. उपमाच देता येत नाही त्याला.

महादेव बी. बुरुटे
मो. 9765374805

"यी यी. अगं ए म्हातारे, भिवा आला बग खुटं घिवुन. आरं ए पोरानु, खुटं ठिवा रं आत न्हिऊन." अंगणात, गोठ्यात झाडलोट करता करता आजोबा फर्मान सोडायचे. आम्ही बारकी पोरं ती घ्यायला पुढे व्हायचो. पण भिवाकाका "आरं थांबा. झेपणार न्हाय. वजं हाय. मीच ठिवतू सरका. ही पिशवी धरा." असं म्हणत हातातली पिशवी देत (त्या पिशवीत रानफुलं, डाळींबाची फुलं, फूलकळ्या, कच्ची सिताफळे, डाळींब, केळी, पेरू, त्यात काही पिकलेलीही फळे, बेलपाने, बेलफळे वगैरे असत.)

(उर्वरित उद्याच्या अंकात)

# रॅगिंग : यवतमाळ मेडिकलचे पाच विद्यार्थी निलंबित

आधुनिक केसरी न्यूज

**राहुल वासनिक**

**यवतमाळ :** येथील वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांची रॅगिंग घेतल्याप्रकरणी पाच वरिष्ठ विद्यार्थ्यांना निलंबित करण्यात आले आहे. महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. मिलिंद फुलपाटील यांच्या आदेशावरून ही कारवाई करण्यात आली. महाविद्यालय प्रशासन हे प्रकरण दडपत असल्याची तक्रार पीडित विद्यार्थ्यांच्या पालकांनी केली आहे. त्यामुळे या घटनेची आरोग्य विज्ञान विद्यापीठाने गंभीर दखल घेतली असून, सोमवारी विद्यापीठाची पाच सदस्यीय समिती चौकशीसाठी येणार आहे. पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षात शिकत असलेल्या एका विद्यार्थ्याची त्याचा वरिष्ठ सहकाऱ्यांनी सातत्याने शारीरिक, मानसिक छळ केल्याने त्याला 'सोल्युलायटीस' सारखा गंभीर आजाथ झाल्याची तक्रार २३ ऑगस्टला त्याच्या आईने अधिष्ठातांकडे केली होती. या तक्रारीनंतर चार सदस्यीय चौकशी समितीने प्रकरणाशी संबंधित व्यक्तींचे जबाब नोंदविले होते. शल्यक्रिया गृहातील परिचारिकेसह सर्वांचा इनकेमेरा जबाब घेण्यात आला. या समितीने अधिष्ठाता डॉ. फुलपाटील यांच्याकडे शुक्रवारी सायंकाळी अहवाल सादर केला. त्यानंतर या रॅगिंग प्रकरणात प्रथमदर्शनी दोषी आढळलेले डॉ. ओंकार कवतिके, डॉ. अनुप शहा, डॉ. साईलक्ष्मी बानोत, डॉ. प्रियंका साळुंखे व डॉ. पी.बी. अनुशा यांना निलंबित करण्यात आले. वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रशासनाकडून हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न सुरू असल्याची चर्चा महाविद्यालयात आहे. जे विद्यार्थी अँटी रॅगिंग कमिटीत आहेत तेच विद्यार्थी रॅगिंग घेत असल्याचा प्रकार घडल्याने त्या विद्यार्थ्यांना वाचवण्याचे प्रयत्न होत असल्याचा आरोप पालकांनी केला आहे. तक्रार करणाऱ्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयात अधिष्ठाता व विभाग प्रमुखांनी दोन ते तीन तास बसवून ठेवत, या प्रकाराने करिअर संपुष्टात येण्याची भीती दाखविल्याचाही आरोप होत आहे. पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या आठ पैकी सहा विद्यार्थ्यांनी रॅगिंग झाल्याची कबुली चौकशी समितीसमोर दिल्याची माहिती आहे. वैद्यकीय शिक्षण विभागानेही या प्रकरणाची दखल घेतली असून अहवाल मागविण्याची माहिती सूत्रांनी दिली.




# डॉ.सौ.इं.भा.पा. महिला कला महाविद्यालयात वाणिज्य दिवसाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** गुरुवार दि. 26 रोजी डॉ.सौ. इं.भा.पा. महिला कला महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागातर्फे "वाणिज्य दिवस" साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. वसुधा पुरोहित, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. डॉ. सुनंदा चक्रनारायण आणि प्रा.डॉ. सुनिता बाजपाई आदी मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात दिप प्रज्वलाने करण्यात आली आणि प्रथम वर्षाची विद्यार्थिनी कुमारी सानिका देशमुख हिने स्वागतपर श्री गणेश वंदना आपल्या कथ्थक नृत्यातून सादर केली.

या कार्यक्रमासाठी शुभेच्छा देताना महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वसुधा पुरोहित यांनी या कार्यक्रमासाठी उपस्थित असलेले सर्व विद्यार्थिनींनीचे अभिनंदन केले तसेच समर्पक शब्दांमध्ये वाणिज्य दिवसाचे महत्व सांगितले. हा दिवस साजरा करण्यासाठीचा विद्यार्थिनींचा उत्साह व तयारी पाहुन प्राचार्यांनी सर्वांचे खूप कौतुक केले.

सुरुवातीला वाणिज्य विभाग प्रमुख प्रा.डॉ. सुनंदा चक्रनारायण यांनी वाणिज्य विभागाअंतर्गत घेण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. तसेच वाणिज्य दिवस साजरा करण्याचा उद्देश काय आहे हे सांगितले आणि दरवर्षी हा उपक्रम वाणिज्य विभागातर्फे राबविण्यात येईल असे प्राचार्यांच्या परवानगीने विद्यार्थ्यांना आश्वासन दिले.

प्रा.डॉ. सुनिता बाजपाई यांनी सांगितले की, दैनंदिन आयुष्यात व्यवस्थापनाच्या विविध तत्वांचा वापर केला जातो. या दृष्टीने वाणिज्य ही सर्वोत्तम शाखा आहे असे प्रतिपादन केले. वाणिज्य विषयात उत्कृष्ट असलेले विद्यार्थी आपल्या दैनंदिन जीवनात यशस्वी होतात असे मत त्यांनी व्यक्त केले.

वाणिज्य दिनानिमित्त विविध वाणिज्य खेळ, प्रश्न मंजुशा, कॉमर्स कनेक्शन गेम, टीम बिल्डिंग गेम, कॅल्क्युलेशन गेम घेण्यात आले. तसेच कवितेच्या माध्यमातून पुस्तपालनाचे व लेखाकर्माचे नियम सांगितले व नियोजन, संघ भावना, समन्वय या व्यवस्थापन तत्वांची सांगड घालत विद्यार्थिनींनी खेळ खेळले.

या कार्यक्रमासाठी विविध विभागाचे विभाग प्रमुख, प्राध्यापक वर्ग तसेच सर्व विद्यार्थिनी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी रिया ढोले आणि कुमारी आकांशा तांदळे यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रकटन कुमारी शारदा वैजवाडे हिने केले. विशेष बाब म्हणजे या कार्यक्रमाचे आयोजन पूर्णतः विद्यार्थिनींने केले.

# श्री छावणी गणेश महासंघाच्या कार्यालयाचे भव्य उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज



**दौलताबाद :** केंद्रीय राज्यमंत्री डॉ.भागवत कराड यांच्या हस्ते छावणी गणेश महासंघ कार्यालयाचे उद्घाटन यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटन झाल्यानंतर सामूहिकरित्या श्री ची आरती करण्यात आली. या उद्घाटन कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री अतुल सावे, आमदार संजय शिरसाठ, किशनचंद तनवाणी, नंदकुमार घोडेले, अशोक सायना यादव, राजू शिंदे, रखमाजी जाधव, संस्थापक अध्यक्ष पृथ्वीराज पवार, छावणी परिषदेचे मुख्यकार्य अधिकारी संजय सोनवणे, छावणी परिषदेचे सदस्य प्रशांत तारगे, रखमाजी जाधव, किशोर कछवा, संतोष आमले, ॲड.अशोक मूळे, दिपक बनकर, दिपक ढाकणे, करण सिंग काकस, शेख हनीफ, अनिल जयस्वाल, संजय गारोल, राजेश आमले, भगवान आमले, गणेश कांबळे, अतुल शिंदे, राहुल वाणी, बाळासाहेब आमले, माऊली आमले, ॲड.पप्पू वर्मा, महादेव जाधव, नितीन यादव, संतोष शिंदे, नवनाथ मात्रे, किसन कनिसे, शेख वजीर, गणेश कल्याणकर, संजय धर्म रक्षक, एम.ए. अझर, इत्यादी गणेश भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांनी यावेळी बोलताना सांगितले की, प्रधानमंत्री आवास योजनेच्या माध्यमातून पडेगाव येथे १७ सप्टेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त लवकरच भूमिपूजन करून घरे उपलब्ध करून दिले जातील. केंद्रीय वित्त राज्यमंत्री डॉ. कराड यांनी एक विशेष घोषणा केली की छावणीमधील जितके मंडळ असतील त्या मंडळाच्या अध्यक्षांचा दोन लाख रुपयेचा विमा मी स्वतः माझ्यातर्फे काढून देणार आहे. त्यासाठी छावणीमधील जेव्हढे मंडळ असतील त्या अध्यक्षांची यादी माझ्याकडे देण्यात यावी, विसर्जनच्या दिवशी या सर्वांचा विमा काढण्याची प्रत त्या मंडळाचे अध्यक्षांच्या स्वाधीन केली जाईल, अशी घोषणा त्यांनी यावेळी केली. त्यानंतर गणेश महासंघाचे अध्यक्ष अशोक आमले यांनी सर्व मान्यवरांचे गणेश भक्तांचे आभार व्यक्त केले आणि येणाऱ्या दिवसांमध्ये छावणी गणेश महासंघातर्फे विविध खेळांचे कार्यक्रमाचे आयोजन केले असून सर्वांनी याचा लाभ घ्यावा आणि येणाऱ्या काळामध्ये नियमत राहून गणेश उत्सव आनंदात साजरा करावा, असेही आवाहन गणेश भक्तांना केले.

# देव्हारी व सावळदबारा परिसरात पावसाने दडी मारल्यामुळे शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ

आधुनिक केसरी न्यूज



**बहादुर चव्हाण**

**देव्हारी :** सोयगाव तालुक्यातील देव्हारी, सावळदबारा, नांदा तांडा, घाणेगाव तांडा, डाभा व इतर परिसरातील सोयाबीन व इतर पिके शेंगा भरण्याच्या परिस्थितीत आहे. परंतु गेल्या आठ-दहा दिवसापासून पावसाने दांडी मारल्यामुळे कोरडवाहू शेतकऱ्यांची पिके धोक्यात आली असल्यामुळे शेतकऱ्यांच्या नजरा आकाशाकडे लागल्या आहे. जून महिन्याच्या सुरुवातीला पाऊस पडला नाही परंतु दुसऱ्या हप्त्यापासून धोडप परिसरात कमी प्रमाणात परंतु पेरणी योग्य पाऊस झाल्यामुळे शेतकऱ्यांची सोयाबीन इतर पिकाची पेरणी व लागवड उरकून घेतली. जुलैच्या संपूर्ण महिन्यात कमी प्रमाणात पाऊस पडल्याने पिके बहरली. पावसाने मधात उघडीत दिल्याने शेतकऱ्यांच्या पिकांचे कोळपणी, खुरपणी, फवारणी वेळेवर झाल्यामुळे पिके जोमात आली. सोयाबीनला फुले लागल्यानंतर आता शेंगांची भरणी सुरू आहे अशातच तापमानात प्रचंड वाढ होऊन पाऊस गायब झाल्याने शेंगा परिपक्व न झाल्यास उत्पादनात मोठी घट होऊ शकते. सध्या सोयाबीन पिके दाने भरण्याच्या अवस्थेत आहे परंतु पावसाने दडी मारल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. ज्या शेतकऱ्यांकडे तुषार सिंचनाची सुविधा आहे ते शेतकरी पिकांना पाणी देऊ शकतात परंतु कोरडवाहू शेतकऱ्यांकडे पाणी नाही तेच चिंतेत असून कोरडवाहू शेतकऱ्यांच्या नजरा सध्या आकाशाकडे लागलेल्या आहे. पाऊस कमी प्रमाणात पडल्यामुळे व सततच्या ढगाळ वातावरणामुळे मागील आठवड्यापासून आळीचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात असल्याने सध्या शेतकऱ्यांची किटकनाशक फवारणीची लगबग सुरू आहे. पावसाने मारलेली दडी व सोयाबीन व इतर पिकावर पडलेल्या आळ्यांचा प्रादुर्भावामुळे हाता तोंडाशी आलेले पीक येणार की नाही, अशी चिंता शेतकऱ्यांच्या मनामध्ये आहे. गणपती बाप्पाच्या आगमनानंतर तरी पाऊस पडेल अशी आशा शेतकऱ्यांच्या मनामध्ये लागली आहे. शेतकऱ्यांवरती आलेले विघ्न गणपती बाप्पा दूर करतील, अशी आशा शेतकऱ्यांना लागली आहे. पुढच्या दोन-चार दिवसात पाऊस आला नाही तर शेतकऱ्यावर मोठे संकट ओढवण्याची शक्यता आहे.

# पुरात वाहून गेलेल्या शेतकऱ्याच्या कुटुंबास चार लाख रुपयांचा धनादेश सुपूर्द

आधुनिक केसरी न्यूज



**पुसद :** तालुक्यातील आडगांव येथील शेतकरी हनवता मारोती ढाकरे वय (६५) या शेतकऱ्याचा नाल्यात पाय घसरल्याने पुरात वाहून अपघाती मृत्यू झाला असल्याची घटना ८ ऑगस्ट २०२२ रोजी घडली होती. पाण्याचा अंदाज न आल्याने आडगावच्या हनवता ढाकरे या शेतकऱ्याचा पुराच्या पाण्याने वाहून जाऊन मृत्यू झाला. ही घटना दुर्दैवी असून त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना शासन स्तरावरून मदत मिळावी यासाठी तहसीलदार पुसद यांच्याकडे ॲड. सुनिल ढाले यांनी अर्ज केला होता. पाठपुराव्याने तात्काळ मदत मिळाल्याने आडगांव ग्राम पंचायतीच्या वतीने प्रशासनाचे आभार व्यक्त केले आहे. आज उपविभागीय अधिकारी कार्यालयात नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत चार लाख रुपयांचा सानुग्रह निधीचा धनादेश त्यांच्या पत्नी श्रीमती धुरपताबाई हनवता ढाकरे, मुलगा बाळू, संदीप यांच्या उपस्थितीत धनादेश दिला. यावेळी ॲड सुनिल ढाले, उपसरपंच साहेबराव चव्हाण, उमेश राठोड, सुरेश वंजारे, विक्की वंजारे हे उपस्थित होते.








# अन्नक्षेत्र संस्थेतर्फे गरीब मुलांना खाऊचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** अन्नाचे महत्व पटवून देणाऱ्या अन्नक्षेत्र या देशपातळीवरील संस्थेतर्फे भारतभर दुर्बल घटकांतील लोकांसाठी विविध अन्न पदार्थ वाटण्यात येतात, प्रत्येक वेळेस वेगवगळ्या पदार्थांचे वाटप होते. त्यामध्ये, पोषक अन्नपदार्थ दिले जातात, आर्थिक दुर्बल घटकांपर्यंत हे पदार्थ पोहोचविण्याचे काम राष्ट्रभर विविध स्वयंसेवक उत्स्फूर्तपणे करतात. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव निमित्त मुलांना यानिमित्त कॅडबरी मंच या चॉकलेटचे वाटप करण्यात आले. माळीवाडा येथील तांड्यावर गरीब मुलांना याचे वाटप करण्यात आले तेंव्हा त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद बघण्यासारखा होता. त्या छोट्याशा खाऊने त्यांच्या चेहऱ्यावर इंद्रधनुचे रंग पहावयास मिळाले तसेच माळीवाडा येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत खाऊचे वाटप केले. त्याअगोदर मुलांशी संवाद साधला. आधुनिक केसरीचे संपादक डॉ. प्रभू गोरे यांनी अन्नाच्या महत्त्वाबद्दल खूप छान विवेचन केले, तथा मुलांच्या बुद्धिमत्तेची चाचणी घेतली. ग्रामीण भागातील मुले असून अतिशय उत्साही व हुशार आढळून आले, संपुर्ण शिक्षक वृंदांनी मुलांचा खूप छान अभ्यास करून घेतलेला दिसून आला. अन्नक्षेत्रचे मराठवाडा प्रमुख व आधुनिक केसरीचे सरव्यवस्थापक विभाकर खांदेवाले यांनी मुलांचे खेळ घेत वातावरण प्रफुल्लित करून टाकले. मुलांनाही यामधे खूप मजा आल्याचे दिसले. माळीवाडा शाळेचे मुख्याध्यापक अधाने व दौलताबाद शाळेचे मुख्याध्यापक जाधव तसेच सर्व स्टाफने छान सहकार्य केले. तेथील स्थानिक रहिवाशी व आधुनिक केसरीचे प्रतिनीधी प्रकाश लकडे यांनी त्या भागातील गरीब मुले एकत्र आणून खाऊ वाटपास हातभार लावला.

# ‘स्पॉन्सर स्टडी व्हिसा’

आधुनिक केसरी

ब्रिटीश उच्चायुक्तालयाने अलीकडेच ही माहिती उघड केली आहे की युनायटेड किंगडम (यूके) ने जून २०२२ पर्यंत एका वर्षात भारतीय विद्यार्थ्यांना १,१७,९६५ ‘स्पॉन्सर स्टडी व्हिसा’ जारी केले आहेत. जी २०१९ च्या तुलनेत २१५ टक्के वाढ आहे. कारण, तेव्हा केवळ ३७ हाजर ३९६ व्हिसा जारी करण्यात आले होते. तसेच, ‘यूके’कडून सर्वाधिक ‘स्पॉन्सर स्टडी व्हिसा’ मिळवण्यात भारत अव्वल स्थानावर असून, चीनलाही मागे टाकले आहे. जाणून घेऊयात कोविड निर्बंध शिथिल केल्यानंतर इतक्या मोठ्या संख्येने विद्यार्थी ‘स्पॉन्सर स्टडी व्हिसा’साठी का अर्ज करत आहेत? ब्रिटनमध्ये जाण्यासाठी विद्यार्थी व्हिसा मिळण्याचं प्रमाण हे जवळपास १०० टक्के आहे. याचा अर्थ, जे कुणी विद्यार्थी ब्रिटनमध्ये शिक्षण घेण्यासाठी व्हिसा अर्ज करतात, त्या सगळ्यांना व्हिसा मिळतो. त्यामुळे जून २००२ पर्यंत विद्यार्थ्यांना मिळालेल्या व्हिसाची संख्या १ लाख ८० हजार आहे म्हणजेच व्हिसासाठी आलेल्या अर्जांची संख्या देखील जवळपास तितकीच आहे. तसेच, अमृतसरमधील धवन एज्युकेशनल कन्सल्टन्सीचे मालक चित्रेश धवन यांनी माहिती दिली की, ‘स्पॉन्सर स्टडी व्हिसा’ केवळ ३ ते ४ आठवड्यांत येतो, जे विद्यार्थ्यांमधील प्रमुख आकर्षण आहे. सध्या भारतीय विद्यार्थ्यांमध्ये उच्च शिक्षणास परदेशात जाण्यासाठी यूकेला सर्वाधिक पसंती दिली जात आहे. या शतकाच्या पहिल्या दशकात, भारतातील बहुतांश विद्यार्थी यूकेकडे निघाले होत, परंतु २००६ -०७ पर्यंत हा कल ऑस्ट्रेलियाकडे वळल्याचे दिसून आले. २०११-१२ पर्यंत दरवर्षी भारतातून लाखोंच्या संख्येत विद्यार्थी जात होते. यापैकी बहुतांश विद्यार्थी हे पंजाबचे होते. त्यानंतर काही वर्षांनी विद्यार्थ्यांचा ओढा कॅनडाकडे वाढला आणि मागील जवळपास एक दशकापासून कॅनडा हे भारतातील विद्यार्थ्यांसह आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांसाठी सर्वाधिक पसंतीचे ठिकाण बनले आहे. आजही जेव्हा मोठ्या संख्येने विद्यार्थी यूकेला जात आहेत, तेव्हा त्यापैकी बहुतेकांनी प्रथम कॅनडाला जाण्याचा प्रयत्न केल्याचे दिसत आहे. एका सल्लागाराने सांगितले की कॅनडात विद्यार्थी व्हिसा अर्जांमध्ये अचानक झालेली वाढ हे देखील नकार येण्यामागचे एक कारण आहे. त्यामुळे एक वर्ष किंवा सहा महिन्यांचे नुकसान टाळण्यासाठी, विद्यार्थी आता यूकेसाठी अर्ज करत आहेत. जिथे व्हिसा प्रक्रिया जलद आणि जवळजवळ निश्चित आणि छोटी आहे, धवन म्हणाले की, यूकेमध्ये देखील विद्यार्थ्यांना त्यांचा अभ्यास पूर्ण झाल्यानंतर वर्क परमिटसाठी चांगल्या सुविधा मिळत आहेत. याशिवाय, यूके व्हिसा प्रक्रिया पारदर्शक आहे. यूके कडून अनेक ‘स्टडी व्हिसा’जारी करण्याचे आणखी एक कारण म्हणजे अनेक पाश्चात्य देशांमध्ये अधिकाधिक ‘स्टडी व्हिसा’ जारी करण्याची शर्यत आहे. कारण शिक्षण क्षेत्र या देशांच्या अर्थव्यवस्थेला मोठी चालना देत आहे. जेथे लाखो विद्यार्थी दरवर्षी अभ्यासासाठी येतात.



अमोल पुसदकर
संपर्क क्र. 9552535813

# उत्सवाचा सामाजिक संदेश

आधुनिक केसरी

**सार्वजनिक गणेश उत्सवाच्या निमित्ताने वस्तीतील लोक एकत्र आले पाहिजे याचा प्रयत्न होणे आवश्यक आहे. आजकाल शेजारी कोण राहते हे शेजारच्याला माहिती नसते. माणसातील ही दूरी कमी व्हावी यासाठी गणेश उत्सवाचा उपयोग होऊ शकतो. कारण माणूस म्हणून जरी हे लोक एकमेकांपासून दूर असले तरी दोघांचेही आराध्य दैवत भगवान गणेश असू शकते. आणि गणपतीच्या भक्ती पायी का होईना परंतु ते लोक एकत्र येतील असा प्रयत्न व्हायला पाहिजे.**

ज्यावेळेस देशावर इंग्रजांचे राज्य होतं त्यावेळेस लोकांनी एकत्र येणे, शस्त्र बाळगणे, त्यानंतर इंग्रजांच्या विरोधातील भाषणे इत्यादी गोष्टींवर बंदी होती आणि म्हणून कोणत्या ना कोणत्या निमित्ताने का होईना परंतु लोक एकत्र आले पाहिजे यासाठी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी शिवजयंती उत्सव व गणेश उत्सवाची सुरुवात केली. लोक एकत्र येऊ लागले. घरोघरी व सार्वजनिक ठिकाणी गणपती बाप्पाची स्थापना होऊ लागली. गणेशाची स्थापना करण्यामागे लोकमान्यांचा हेतू हा होता की गणेश ही विद्येची देवता आहे. सर्व देवतांच्या आधी तिची लोक पूजा करतात. त्यामुळे गणेशावरील भक्तीचा उपयोग आपण सामाजिक कार्यासाठी केला पाहिजे. त्यानिमित्ताने लोकांना एकत्र बोलावलं पाहिजे.

तलवार, दानपट्टा आणि विविध शस्त्र चालविण्याचा पदविन्यास लोक विसरत चालले होते. तो पदविन्यास त्यांच्या कायम लक्षात राहिला पाहिजे यासाठी योगचाप म्हणजे लेझीम या खेळाची योजना करण्यात आली. लोक एकत्र येऊ लागले. लेझीम खेळू लागले. त्यानिमित्ताने शस्त्र चालविण्याचा पदविन्यास हा लोकांच्या स्मरणात राहू लागला. वेगवेगळे आखाडे एकत्र येऊ लागले आणि आपल्या शक्ती सामर्थ्याचं, शस्त्र चालविण्याच प्रदर्शन करू लागले. इंग्रजांच्या दृष्टिकोनातून भारतीयांच्या अनेक सणांपैकी हा सण होता. परंतु या सणाच्या निमित्ताने लोक एकत्र आल्यावर ज्या निबंध स्पर्धा होऊ लागल्या जी वेगवेगळी भाषणे होऊ लागली त्यातून स्वातंत्र्याचा जागर होऊ लागला. लोक जागृत होऊ लागले आणि या जागृतीचा उपयोग मग वर्षभर चालणाऱ्या कार्यासाठी होऊ लागला.  आजही महाराष्ट्रात हजारो ठिकाणी सार्वजनिक गणेशांची स्थापना होते. वयमाना परत्वे जुनी पिढी हळूहळू बाजूला होत जाते व नवीन तरुण लोक त्यामध्ये आयोजन करणाऱ्या समितीत येत जातात. परंतु गणेश उत्सवाला जर योग्य मार्गदर्शन नसेल, त्यांच्या मंडळामध्ये जुन्या माहितगार लोकांची संख्या नसेल तर गणेशोत्सव हे कार्यक्रम विहीन होऊन जातात. हे चित्र केवळ आजचे आहे असे नाही तर अनेक वर्षांपासून हे असे चित्र निर्माण झालेले आहे. जुन्याकाळी  सार्वजनिक गणेश उत्सव मंडळांमध्ये जुने सिनेमे दाखविले जायचे लोक. लोक आपापल्या घरचे पोते घेऊन जायचे व जिथे कुठे चांगला चित्रपट असेल तिथे जाऊन तो चित्रपट बघायचे.गणेश उत्सवाचा उद्देश कधीही सिनेमा दाखवून लोकरंजन करणे असा नव्हता .परंतु नेमक्या उद्दिष्टाचे विस्मरण झाल्यामुळे गणेश मंडळ सिनेमा दाखवू लागले. काही वर्षानंतर सिनेमाचे अप्रूप सुद्धा लोकांना राहिले नाही. त्यामुळे लोक रस्त्यावर बसून सिनेमे पाहणे पसंत करायचे नाही. त्यामुळे हळूहळू तो रील चा जमाना गेला व ते सिनेमे दाखवणे सुद्धा बंद झाले.फार थोड्या गणेश मंडळांनी समाजभान जपलेले आढळून येते.

सार्वजनिक गणेश उत्सवाच्या निमित्ताने वस्तीतील लोक एकत्र आले पाहिजे याचा प्रयत्न होणे आवश्यक आहे. आजकाल शेजारी कोण राहते हे शेजारच्याला माहिती नसते. माणसातील ही दूरी कमी व्हावी यासाठी गणेश उत्सवाचा उपयोग होऊ शकतो. कारण माणूस म्हणून जरी हे लोक एकमेकांपासून दूर



असले तरी दोघांचेही आराध्य दैवत भगवान गणेश असू शकते. आणि गणपतीच्या भक्ती पायी का होईना परंतु ते लोक एकत्र येतील असा प्रयत्न व्हायला पाहिजे. गणेश मंडळांनी गणेश भक्ती कशी वाढेल, भगवान गणेशा बद्दल वस्तीतील लोकांना अधिकाधिक माहिती कशी होईल यासाठी भगवान गणेशावर आधारित काही भाषणे, प्रवचन, कीर्तन असे कार्यक्रम केले पाहिजेत. जेणेकरून गणेश उत्सव हा केवळ एक इव्हेंट न राहता त्याच्यामागे भक्ती भावसुद्धा राहील. जेथे भाव तेथे देव जेथे देव तेथे मांगल्य. त्यामुळे डीजेच्या ढणढण आवाजात हा भाव कुठेतरी लोपला जात आहे. हे बघणे आवश्यक आहे. अनेकानेक ठिकाणी गणेशाच्या समोर सिनेमाची गाणी वाजविली जातात. याऐवजी धार्मिक आणि गणेशाशी संबंधित गाणी वाजविली जाऊ शकतात. नऊ दिवस वेगवेगळे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जाऊ शकतात. आपल्या वस्तीमध्ये अनेकानेक लोकांना उत्तम गाणं म्हणता येत असत. परंतु अनेकांना त्याची संधी मिळत नाही. गणेश उत्सवाच्या निमित्ताने ही गायन कला सादर करण्याची संधी सुद्धा आपण लोकांना देऊ शकतो. आजकाल हाऊस म्हणून अनेकानेक लोक अनेकानेक प्रकारचे वाद्य शिकत असतात. गणेश उत्सवाच्या निमित्ताने आपण विविध प्रकारचे वाद्य वाजविण्याचा कार्यक्रम आयोजित करू शकतो .ज्यामध्ये लोकांच्या कलेला वाव मिळेल व गणेशासमोर आपली कला सादर करणे यातून भक्ती भाव सुद्धा प्रकट होईल. आज काल लहान लहान मुलांमध्ये सुद्धा अनेक प्रकारचे चांगले गुण दिसून येतात. त्यामुळे लहान मुलांच्या कल्पकतेला वाव देणाऱ्या विविध प्रकारच्या  स्पर्धा सुद्धा घेता येऊ शकतील. चित्रकला,मातीच्या गणेशाची मूर्ती बनविण्याचे वर्कशॉप सुद्धा मंडळाकडून आयोजित केले जाऊ शकतील. गणेशाची विविध प्रकारची चित्र सुद्धा कशी काढावी हे सुद्धा विद्यार्थ्यांना शिकविले जाऊ शकेल. लोक जागृतीच्या विविध विषयांवर विद्यार्थ्यांकडून निबंध सुद्धा मागविले जाऊ शकतील. घरी राहणाऱ्या गृहिणी सुद्धा भजन, भक्ती गीत गायन, चित्रकला, पाककला विविध प्रकारचे मोदक बनविण्याची स्पर्धा यामध्ये सहभागी होऊ शकतील.

थोडक्यात काय तर गणेशोत्सव हे सांस्कृतिक गणेशोत्सव व्हावेत ही अपेक्षा आहे. यासाठी मंडळाच्या सदस्यांशी सुद्धा सामाजिक संघटनेच्या कार्यकर्त्यांनी संपर्क साधायला हवा.  गणेश उत्सवाच्या आधीच अशा विविध मंडळांची बैठक व त्यामध्ये त्यांना विविध प्रकारचे कार्यक्रम सुचविणे हे झाले पाहिजे. गणेश उत्सवाच्या निमित्ताने वर्गणी गोळा केली जाते. त्या वर्गणीचा विनियोग योग्य मार्गाने कसा होईल हे सुद्धा त्यांना सांगितले गेले पाहिजे. गणेश मंडळाच्या कार्यकर्त्यांनी सुद्धा वर्गणी किती जमा केली व खर्च कसा झाला हे सुद्धा उत्सवाच्या समारोपप्रसंगी जाहीर करायला हवे. यातून आर्थिक पारदर्शिकता याचा एक नमुना सादर होऊ शकेल. तरुणांमध्ये जिमची फॅशन आहे. गणेश उत्सवाच्या निमित्ताने विविध प्रकारचे व्यायाम प्रकार सादर करण्याची स्पर्धा,योगस्पर्धा सुद्धा ठेवली जाऊ शकते.  परंपरागत शस्त्र किंवा परंपरागत खेळ हे सुद्धा शिकविले गेले पाहिजे. यासाठी हे खेळ शिकविणाऱ्या लोकांना बोलवून वस्तीतील महिला असेल किंवा तरुण-तरुणी यांना सुद्धा ते शिकायला लावले पाहिजे. यातून नागरिकांचा आत्मविश्वास वाढीला लागेल. आजकाल फॅन्सी ड्रेस कॉम्पिटिशन सर्वत्र होत असतात. परंतु गणेशोत्सवाच्या निमित्ताने वेगवेगळ्या दिवशी वेगवेगळ्या पारंपरिक वेशभूषा घालून येण्याची स्पर्धा सुद्धा ठेवली जाऊ शकेल. थोडक्यात काय समाज एकत्र आला पाहिजे. समाजाला समाजाच्या समोरच्या समस्या समजल्या पाहिजे. त्यासाठी त्या समस्यांना मांडल्या गेले पाहिजे. समस्या मांडल्या गेल्यानंतर त्याच्यावरच्या उपायांचे सुद्धा विचारमंथन होणे आवश्यक आहे. यातून आमचा समाज सध्या कुठल्या अवस्थेत आहे, त्याच्यासमोर कोणत्या समस्या आहेत, त्या समस्या दूर करण्यासाठी आम्ही सर्वांनी मिळून काय केले पाहिजे अशा पद्धतीचा विचार गणेशोत्सवाच्या निमित्ताने होणे अभिप्रेत आहे. त्याचबरोबर समाजामध्ये कोणत्या नको त्या गोष्टी येऊ पाहत आहे, उदाहरणार्थ तरुणांमध्ये,तरुणींमध्ये, लहान मुलांमध्ये या गोष्टी दूर करण्यासाठी त्या त्या वयोगटातील मुलांचे प्रबोधन कसे केले जाऊ शकते हे सुद्धा बघणे आवश्यक आहे. थोडक्यात काय गणेशोत्सवाच्या निमित्ताने बालगोपाल आणि सर्वच  एकत्र यावेत आणि उत्तम प्रकारचा सामाजिक संदेश सर्वांनी आपापल्या घरी घेऊन जावे. ही ऊर्जा वर्षभर पुरावी. यातून वर्षभर लोकांची मने एकत्र राहावी व त्यांनी चांगल्या चांगल्या सामाजिक गतीविधींमध्ये आपला सहभाग नोंदवावा याचे माध्यम गणेशोत्सव होऊ शकते. असे गणेशोत्सव व्हावेत यासाठी सामाजिक कार्य करणाऱ्या संघटना, त्यांचे कार्यकर्ते, गणेश उत्सव मंडळाचे कार्यकर्ते या सर्वांचेच प्रबोधन होणे आवश्यक आहे. या प्रबोधनातून मोठी सामाजिक जागृती झाली तर लोकमान्य टिळक यांचा उद्देश सफल झाला असे वाटेल.



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

# शिक्षकांचा सन्मान शिक्षण विभागाकडूनच व्हायला हवा

आधुनिक केसरी

**विद्यार्थी शिक्षकांचा सन्मान आईवडिलांप्रमाणेच करतात. एक वेळा विद्यार्थी आपल्या  आईवडिलांचं ऐकणार नाही पण शिक्षकांचा ऐकतात. विद्यार्थी शिक्षकांना आदर्श मानतात. शिक्षकांचा सन्मान करतात. फोटो लावल्यानेच विद्यार्थी शिक्षकांचा सन्मान करतात, हे गृहीतक शिक्षण विभागाला का सुचलं? शिक्षकांचा सन्मान विद्यार्थ्यांकडून नव्हे तर शिक्षण विभागाकडून, सरकारकडून  पाहिजे व समाजाकडून व्हायला पाहिजे.**

शिंदे-फडणवीस सरकार सत्तेवर आल्यापासून नको ते आदेश काढत आहे. गोविंदाना ५टक्के आरक्षण देण्याचा सरकारने आदेश काढून अनेकांचा रोष ओढवून घेतला. दहीहंडीला राष्ट्रीयखेळाचा दर्जा देण्याचा व गोविंदाना ५ टक्के आरक्षण देण्याची घोषणा कोणताही विचार न करता केली. आता शिंदे फडणवीस सरकारने शिक्षकांचा सन्मान करण्यासाठी 'आपले गुरुजी' हा उपक्रम निर्गमित केला आहे. या उपक्रमांतर्गत राज्यातील शाळांमधील वर्ग खोल्यांमध्ये शिक्षकांचा फोटो लावण्याचे आदेश दिले. शिक्षकांचे फोटो वर्गखोलीमध्ये लावण्याच्या निर्णयाचे कारण काय तर विद्यार्थ्यांना शिक्षकांना सन्मान वाटावा. वर्गखोल्यांमध्ये शिक्षकांचे फोटो लावल्यानेच  शिक्षकांचा सन्मान होतो काय? खरं तर  विद्यार्थी शिक्षकांचा सन्मान करतातच. विद्यार्थी शिक्षकांचा सन्मान आईवडिलांप्रमाणेच करतात. एक वेळा विद्यार्थी आपल्या आईवडिलांचं ऐकणार नाही पण शिक्षकांचा ऐकतात. विद्यार्थी शिक्षकांना आदर्श मानतात. शिक्षकांचा सन्मान करतात. फोटो लावल्यानेच विद्यार्थी शिक्षकांचा सन्मान करतात, हे गृहीतक शिक्षण विभागाला का सुचलं? शिक्षकांचा सन्मान विद्यार्थ्यांकडून नव्हे तर शिक्षण विभागाकडून, सरकारकडून  पाहिजे व समाजाकडून व्हायला पाहिजे.खरं तर  शिक्षकांच खच्चीकरण सरकार व शिक्षण विभागाने केले आहे. शिक्षण सेवक पद आणून शिक्षकाला सेवक बनवून टाकले दास बनवून टाकले. वेठबिगार बनवून टाकले. शिक्षकांना मजूर बनवून टाकलं.

वेठबिगार म्हणून तीन वर्षे पर्यत  शिक्षकांना अल्प वेतनावर राबविले जात आहे. पूर्ण शैक्षणिक पात्रता असताना राज्य सरकार व शालेय शिक्षण विभागाने प्राथमिक शिक्षक ते उच्च माध्यमिक शिक्षकांसाठी शिक्षण सेवक पद आणून शिक्षकांचा सन्मान हिरावून घेतला.शासनाच्या प्रत्येक विभागातील चतुर्थ कर्मचाऱ्याला नियुक्ती पासूनच पूर्ण पगार मिळतो.मात्र शिक्षक तीन वर्षे पर्यत शिक्षक सेवक म्हणून कार्य करत असतो.समान काम,समान वेतन असं संविधानिक तरतूद असताना मात्र शिक्षकांना तीन वर्षे पर्यत वेठबिगार म्हणून काम करावं लागतं.हा शिक्षकांचा सन्मान की अपमान? याचा विचार शासनाने करावा.

शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रात नवनियुक्त शिक्षकांना अत्यल्प अपमानजनक मानधनावर काम करावे लागत आहे. ही शासनासाठी शरमेची बाब आहे. डी. एड, बी.एड पूर्ण करायचे, प्रवेश परीक्षा उत्तीर्ण व्हायचे,  अभियोग्यता चाचणी पार करायची आणि हे सर्व करून नोकरी मिळाली तर मानधन मिळत. केवळ सहा हजार.  स्वतःचे राहणीमान चांगले ठेवून दर्जेदार शिक्षण देण्याची कसरत गेली वीस वर्ष शिक्षण क्षेत्रात नवनियुक्त शिक्षक करत आहेत. शिक्षण सेवक योजना हा कलंक आहे, तो समूळ नष्ट करण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे.

समान काम समान वेतन या न्यायानुसार एकाच स्टाफरूममध्ये बसून समान काम करणाऱ्या शिक्षकांना शिक्षण सेवक संबोधणे आणि तुटपुंज्या मानधनावर काम करायला लावून त्यांचे आर्थिक शोषण करणे देशाच्या भविष्याच्या दृष्टीने अहितकारक आहे. केंद्रात एनडीएचे सरकार असताना मनुष्यबळ विकास मंत्रालयाने सर्व राज्यांना एक पत्र देऊन शिक्षक - शिक्षकेतर यांच्या वेतनावर होणारा खर्च कमी करण्याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या. कायमस्वरूपी शिक्षक  नेमन्या एवजी कंत्राटी स्वरूपात कर्मचारी नेमण्याचे सुचवले होते. यासाठी त्यांनी भाजपशासित राज्यांचा दाखला दिलेला होता. गुजरात, राजस्थान व मध्य प्रदेश या राज्यांनी अशा प्रकारच्या योजना सुरू केल्या असून अल्प मानधनावर शिक्षक  उपलब्ध होत असल्याचे लक्षात आणून दिले. मध्यप्रदेश शासनाने शिक्षण हमी योजना, राजस्थानने शिक्षाकर्मी योजना आणि गुजरात मध्ये विद्या सहाय्यक योजना या नावाने सुरू असलेल्या योजनांचा हवाला देत महाराष्ट्र सरकारने १० मार्च २००० रोजी प्राथमिक शिक्षकांसाठी २७ एप्रिल २००० मध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळातील शिक्षकांसाठी शिक्षण सेवक योजना जाहीर केली.

शिक्षक हा विद्यार्थी व पालकांना जोडणारा दुवा आहे.शिक्षक सामाजिक अभियंता आहे.विद्यार्थी घडविण्यात  व समाजाला मार्गदर्शन करणारा शिक्षक आदर्श असतो,काही अपवाद असतील मात्र शिक्षक विद्यार्थ्यांचे गुरू असतात.विद्यार्थ्यांसाठी शिक्षक आदर्श असतात.विद्यार्थी शिक्षकांचा सन्मान करतात. त्यासाठी शिक्षकांचा फोटो वर्गात लावण्याची गरज नाही.शिक्षक राष्ट्रपुरुष नाही.शाळा व महाविद्यालयात फोटो राष्ट्रपुरुषांचे,थोरांचे व महामानवांचे  लावले जातात .शिक्षकांचे नाही.शिक्षण घेत असताना शाळा, महाविद्यालय किंवा शासकीय कार्यालयांमध्ये राष्ट्रासाठी कार्य करणाऱ्या महान व्यक्तींचे फोटो आपण पाहत असतो. पण, आता वर्गांमध्ये शाळेच्या शिक्षकाचे फोटो लावावे, अशी अफलातून कल्पना शिंदे सरकारने शोधून काढत शिक्षकांचा उपहास केला आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं  ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# हॉकीचे जादूगार : मेजर ध्यानचंद



सुरेश मंत्री
संपर्क क्र. ९४०३६५०७२२

आधुनिक केसरी

**२९ ऑगस्ट हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांचा जन्म दिन. हा दिवस राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा केला जातो. ब्रिटीशांच्या राजवटीत गुलामांचे जीणे जगणाऱ्या भारताला जगज्जेतेपदाच्या सिंहासनावर बसवणारे मेजर ध्यानचंद यांची कर्तबगारी कोणत्याही अव्वल देशभक्तापेक्षा कमी नव्हती. १९२८, ३२ व ३६ या पाठोपाठच्या ऑलिम्पिकमध्ये हॉकीतील सुवर्ण पदकांची हॅट्रिक भारताने साजरी केली, त्यात मेजर ध्यानचंद यांचा सिंहाचा वाटा होता. त्या तीन ऑलिम्पिकमध्ये भारताच्या १०१ गोलापैकी ३८ गोल तर चक्क ध्यानचंदने लगावलेले. हॉकीतील या जादूगाराविषयी लिहावं-बोलावं तितकं थोडकच.**

२९ ऑगस्ट हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांचा जन्म दिन राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा केला जातो. ह्याच दिवशी भारताचे राष्ट्रपती उत्कृष्ट खेळाडूंना खेलरत्न पुरस्कार, अर्जुन पुरस्कार आणि द्रोणाचार्य पुरस्कार प्रदान करतात. आज संपूर्ण देश हॉकीच्या इतिहासातील सर्वाधिक उत्कृष्ट खेळाडू मेजर ध्यानचंद यांची आठवण काढत आहे. ब्रिटीशांच्या राजवटीत गुलामांचे जीणे जगणाऱ्या भारताला जगज्जेतेपदाच्या सिंहासनावर बसवणारे मेजर ध्यानचंद यांची कर्तबगारी कोणत्याही अव्वल देशभक्तापेक्षा कमी नव्हती. १९२८, ३२ व ३६ या पाठोपाठच्या ऑलिम्पिकमध्ये हॉकीतील सुवर्ण पदकांची हॅट्रिक भारताने साजरी केली, त्यात मेजर ध्यानचंद यांचा सिंहाचा वाटा होता. त्या तीन ऑलिम्पिकमध्ये भारताच्या १०१ गोलापैकी ३८ गोल तर चक्क ध्यानचंदने लगावलेले. हॉकीतील या जादूगाराविषयी लिहावं-बोलावं तितकं थोडकच.

उत्तर प्रदेशातील अलाहाबाद येथे २९ ऑगस्ट १९०५ मध्ये ध्यानचंद यांचा जन्म झाला. त्याचं मूळ नाव "ध्यान सिंग" आहे. परंतु ते रात्री उशीरापर्यंत हॉकीचा सराव करायचे म्हणून त्यांच्या मित्रांनी त्यांना रात्रीच्या चंद्राची उपमा देऊन त्यांचं ध्यानचंद हेच नाव प्रसिद्ध केलं! त्यांचे वडील सामेश्वर दत्त सिंग हे भारतीय सैन्यात असल्याने त्यांच्या वारंवार बदल्या होत. याच कारणामुळे पहिल्या सहा वर्षांनंतर ध्यानचंद यांचे शिक्षण पूर्ण होऊ शकले नाही.

त्यांच्या वडिलांना निवृत्तीनंतर उत्तर प्रदेशातील झांशीमध्ये एक जमिनीचा तुकडा मिळाला आणि तेथेच ते स्थायिक झाले. ध्यानचंद यांना मूलसिंग व रूपसिंग हे दोन भाऊ होते. त्यांना लहानपणी कुस्तीची आवड होती, पण सैन्यात दाखल होईपर्यंत हॉकीची त्यांना फारशी माहिती नव्हती. १९२२ मध्ये १६व्या वर्षी ते सैन्यात दाखल झाले. त्या वेळी सैन्याच्या रेजिमेंटमध्ये होणाऱ्या हॉकी सामन्यांत खेळताना त्यांच्या ड्रिबिलगचे कौशल्य मेजर बाले तिवारी यांच्या नजरेत भरले आणि त्यांनी ध्यानचंद यांच्याकडून हॉकीचे तंत्र व कौशल्य घोटवून घेतले. त्यामुळे १९२२ ते १९२६ या काळात रेजिमेंटच्या तसेच विविध स्पर्धामध्ये त्यांनी आपल्या असामान्य कौशल्याची मोहर उमटवली. या त्यांच्या कर्तृत्वामुळे न्यूझीलंड दौऱ्यावर जाणाऱ्या इंडियन आर्मी संघात त्यांची निवड झाली. त्या दौऱ्यात त्यांनी १८ सामने जिंकले, दोन बरोबरीत सुटले व एकमेव लढत त्यांनी गमावल्याने त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव झाला. नंतर न्यूझीलंडविरुद्धच्या दोन कसोटी लढतींत पहिली त्यांनी जिंकली तर दुसऱ्या लढतीत मात्र निसटता पराभव झाला. या दौऱ्यावरून परतताच ध्यानचंद यांना लान्स नाईक बढती मिळाली. ॲमस्टरडॅम येथे १९२८ मध्ये होणाऱ्या ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धामध्ये प्रथमच हॉकीचा समावेश करण्यात आल्याने भारतीय हॉकी महासंघाने भारतीय संघाची निवड करण्यासाठी आंतर-परगण्यांच्या स्पर्धेचे आयोजन केले होते. यात युनायटेड प्रोव्हिन्सेस, पंजाब, बंगाल, राजपुताना व सेंट्रल प्रोव्हिन्सेस या पाच संघांचा समावेश होता. या स्पर्धेत युनायटेड प्रोव्हिन्सेस संघाकडून खेळण्यासाठी ध्यानचंद यांनी आर्मीची परवानगी मिळविली.

सेंटर फॉर्वर्ड म्हणून खेळणारे ध्यानचंद आणि इनसाईड राईट मार्टिन यांनी अनोखा ताळमेळ दाखवत या स्पर्धेत धमाल उडवली व युनायटेड प्रोव्हिन्सेसने ही स्पर्धा आरामात जिंकली. ध्यानचंद यांच्या कौशल्यपूर्ण खेळाने सर्वांनाच भुरळ घातली आणि ऑलिम्पिकसाठी भारतीय हॉकी संघातील त्यांचा प्रवेश निश्चित झाला. ऑलिम्पिकसाठी ॲमस्टरडॅमला रवाना होण्यापूर्वी भारतीय संघ मुंबईत आला, पण मुंबईविरुद्धच्या सराव सामन्यात त्यांना ३-२ असा पराभव स्वीकारावा लागल्याने त्यांचा निरोप समारंभ तसा थंडच झाला. मात्र भारताने नंतर इंग्लंडमधील ११ सराव सामने आणि नंतर ऑलिम्पिकसाठी ॲमस्टरडॅम येथे दाखल झाल्यानंतर सराव सामन्यांमध्ये हॉलंड, बेल्जियम, जर्मनीसारख्या संघांना सराव सामन्यात धूळ चारली होती. पहिल्याच ऑलिम्पिक लढतीत भारताने ऑस्ट्रियाला ६-० असे नमवून तर बेल्जियम, डेन्मार्क, स्वित्झर्लंड या संघांवर एकतर्फी विजय मिळवत अंतिम फेरीत धडक मारली. अंतिम फेरीत यजमान नेदरलँडवर ३-० असा विजय मिळवत ध्यानचंद यांनी भारताला हॉकीतील पहिले सुवर्णपदक मिळवून दिले. पाच लढतींत त्यांनी तब्बल १४ गोल केल्याने हॉकी विश्वात हॉकीतील जादूगार अशी त्यांची कीर्ती पसरली. जाताना थंडे स्वागत झालेल्या या संघाचे विजयानंतर मात्र



मायदेशात जल्लोशात स्वागत झाले. १९३२च्या ऑलिम्पिकमध्येही भारतीय संघाने अपराजित राहत अंतिम फेरीत अमेरिकेवर २४-१ असा मोठा विजय मिळवत पुन्हा एकदा ऑलिम्पिक सुवर्णपदकाला गवसणी घातली.

मेजर ध्यानचंद यांचे अनेक किस्से आजसुद्धा सांगितले जातात. पण १९३६ च्या बर्लिन ऑलंपिकमध्ये ध्यानचंद यांनी हिटलरचा प्रस्ताव फेटाळण्याचा किस्सा अविस्मरणीय आहे. मेजर ध्यानचंद यांचा आणि त्यांच्या नेतृत्वाखाली भारतीय हॉकी संघाचा तो सुवर्णकाळ होता. तथाकथीत आर्यन संस्कृतीची, आणि काळ्या-सावळ्या रंगाच्या माणसांना गुरेढोरे संबोधणाऱ्या नाझी हिटलरच्या फॅसिस्ट जर्मनीत, या काळ्या-सावळ्या कलाकारांनं जर्मनीचा आठ विरुद्ध एक गोलनी पाडाव केला. ध्यानचंदच्या सहा गोलनी जणु हिटलरच नाक कापलं आणि तेही नाझी जर्मनीच्या राजधानी बर्लीनमधील ऑलिम्पियाडमध्ये! मेजर ध्यानचंद यांचा खेळ आवडल्यानं जर्मनीचा हुकूमशहा हिटलरने त्यांना आपल्या सैन्यात मोठं पद देऊ केलं आणि जर्मनीसाठी हॉकी खेळण्यास सांगितलं. ध्यानचंद त्यावेळी भारतीय लष्करात लान्स नायक या कनिष्ठ पदावर कार्यरत होते. पण जर्मन सैन्यातल्या मोठ्या पदाची ऑफर ध्यानचंद यांनी स्पष्टपणे नाकारली. "मी भारताचं मीठ खाल्लं आहे. त्यामुळे भारतासाठीच कायमचा खेळत राहीन," असं ध्यानचंद नम्रपणे हिटलरला म्हणाले.

दुसऱ्या महायुद्धाआधी भारतीय हॉकी संघाने न्यूझीलंडचा प्रदीर्घ विजयी दौरा केला होता. खराब क्रीडांगण व सदोष व पक्षपाती पंचगिरी हे अडथळे लिलया पार केले होते. ध्यानचंदच्या हॉकी-स्टिकमधील जादूने न्यूझीलंडला वेड लागलं होतं. तेव्हा असं सांगितलं जायचं की, ध्यानचंदचे पांढरे कॅनव्हास शूज व पांढरा चेंडू, यापैकी चेंडू कोणता हे कोडं प्रतिपक्षास सोडवता येत नव्हतं. प्रतिपक्षाच्या मनात असा गोंधळ उडवून दिला तो फक्त एकमेव हॉकीपटुने, ध्यानचंदनी. त्यांच्या हॉकी स्टिकमध्ये चुंबक असल्याचं म्हणत अनेकदा ध्यानचंद यांची स्टिक बदलण्यात आली. हा किस्सा काल्पनिक मानला, तर जगातील इतर कोणत्याही हॉकीपटुविषयी दंतकथांचे असे वलय निर्माण का झाले नाही ? क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल मेजर ध्यानचंद यांना १९५६ साली 'पद्मभूषण' पुरस्कारानं गौरवण्यात आलं. हॉकीच्या या महान खेळाडूचं ३ डिसेंबर १९७९ रोजी दिल्लीत निधन झालं. मेजर ध्यानचंद यांना भारतरत्न पुरस्कार देण्याची मागणी केली जातेय. माजी गृहराज्यमंत्री किरण रिजुजू यांनीही भारतरत्नसाठी मेजर ध्यानचंद यांची शिफारस करण्यात आल्याचं काही वर्षांपूर्वी म्हटलं होतं. मात्र, अद्याप मेजर ध्यानचंद यांना भारतरत्न पुरस्कार देण्यात आलेला नाही.

# स्त्री समजून घेताना



संध्या सिनकर
संपर्क क्र. 9920740645

आधुनिक केसरी

**रजिया सुलताना यांना व्याख्यानासाठी फिरताना अनेक अनुभव आले. ते अनुभव त्यांनी साध्या, सरळ शब्दात 'स्त्री समजून घेताना' या पुस्तकात शब्दांकित केले आहेत. हल्ली माणसाने खूप प्रगती केली आहे. पण स्त्रीच्या संदर्भात विचार करण्याची त्याची पद्धत तशीच राहिली. त्यामुळे स्त्रियांनी अर्थार्जन करणे गरजेचे आहे. नवरा मेहनती, निर्व्यसनी असला तरी तो अर्ध्या आयुष्यात मेला किंवा त्याला अपघात झाला, अपंग झाला, दीर्घ आजाराला बळी पडला, परस्त्री संबंधात अडकला वा जेलमध्ये गेला तर बाईने काय करायचे? भविष्याचा वेध घेऊन बाईंनी कमावते होणे गरजेचे आहे.**

रजिया सुलताना या लेखिका व सामाजिक कार्यकर्त्या आहेत. त्या वृत्तपत्रात लिहितात. गावोगाव फिरून अंधश्रद्धा, दारूबंदी, महिला अत्याचार व शिक्षण अशा अनेक विषयांवर जनजागृतीसाठी व्याख्याने देतात. लेख लिहितात. त्या म्हणतात वृत्तपत्रात लिखाणाचा पैशाच्या रूपात मोबदला मिळत नाही. आपलेच विचार आपल्याला विकत घेऊन वाचावे लागतात. लोकांना वाटतं वृत्तपत्रात लिहिणारे फुकटात लिहून आपली किंमत कमी करतात. त्यांना शब्दांची किमया माहीत नाही. लेखिका म्हणते शब्दामुळे मला ओळख, नावलौकिक मिळाला व पुरस्कारही मिळाले.

भारत हा प्रचंड लोकसंख्या असलेला, हजारो धर्म, लाखो जाती असलेला देश आहे. तरीही येथे लोकशाही जिवंत आहे याचे कारण म्हणजे भारतीय संविधान. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय घटनेचे शिल्पकार आहेत. संविधानाची तीन मूल्य आहेत स्वातंत्र्य, समता आणि बंधुता. संविधानाने आपल्याला जगण्याचे, विचार करण्याचे व अभिव्यक्ती करण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. 'एक व्यक्ती एक मत' संविधानाने आपल्याला दिले आहे. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असा संविधानिक मूल्य घेऊन जगणारा माणूस हरवत चालला आहे.

मानवतावादी दृष्टिकोनातून स्त्रियांना समजून घेतले पाहिजे. स्त्रियांचे लैंगिक शोषण, त्यांच्या लैंगिक समस्या लेखिकेने मोकळेपणाने, परखडपणे आणि वास्तववादी स्वरूपात मांडल्या आहेत. त्या म्हणतात कष्टकरी महिला अतिशय गरिबीत, प्रतिकूल परिस्थितीत देखील खूप चांगल्या पद्धतीने आयुष्य जगतात. वेदनांचे भांडवल करत नाहीत. बलात्कार, ॲसिड हल्ला यासारखे गुन्हे घडू नयेत म्हणून भोवताली संवेदनशील समाज निर्माण झाला पाहिजे. स्त्री घरावर मनापासून प्रेम करते. पण ती लग्नाच्या वयाची झाली की तिला तुला परक्या घरी जायचे आहे असे ऐकवले जाते. लग्न होऊन सासरी गेली की तिथेही तिला सगळे आपल्या मर्जीप्रमाणे करता येत नाही. नंतर सून, नातवंड आली की मुलगा सांगतो आई, तुझी संसारात जास्त लुडबुड नको. शांततेने राहा.

लेखिका २५ वर्षे समूपदेशन क्षेत्रात काम करतात. या क्षेत्रात अतिशय संयमाने, तोल न जाऊ देता बोलावे लागते. शक्ती-युक्ति, वाद-संवाद, कर्तुत्व-वक्तृत्व, प्रश्न-उत्तर आदींचा संगम म्हणजे कौन्सिलिंग क्षेत्र आहे. त्यामुळे स्त्रियांच्या जगण्याविषयी त्यांच्या समस्यांविषयींचे लेखिकेचे अनुभव वाचनीय आहेत.

माणसाच्या लैंगिक आयुष्यातील प्रणय भावना, प्रणय निवृत्ती व संसार संन्यास यातील सत्य त्यांनी साध्या सरळ भाषेत मांडले आहे. त्यांनी या विषयावर पुस्तकेही लिहिली आहेत. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी व्याख्याने दिली आहेत. हे सर्व करताना समाजाचे आलेले अनुभव त्यांनी या पुस्तकात शब्दांकित केले आहेत.

पुस्तकातील अनेक लेखांचा शेवट त्यानी चार ओळींच्या अर्थवाही, सुंदर अश्या कवितानी केला आहे. नवरा बायकोच्या नात्याविषयी त्या म्हणतात

'जेव्हा नवरा बायकोला वाटते
जोडीदार म्हणजे बला आहे
तेव्हाच कळते संसार म्हणजे
जीवन जगण्याची कला आहेः

वैवाहिक जीवनातील फसवणूक, घटस्फोट याविषयीचे अनुभव पुस्तकात आहेत. रजियाजी म्हणतात महिलांची वेदना ही काहींची रोजी रोटी झाली आहे. तरीही प्रतिकूल परिस्थितीतून महिला प्रगती करत आहे. मुलीचा गर्भ आहे हे कळल्यावर असुरक्षित गर्भपात केला जातो. त्यात बाईच्या जीवाला धोका असतो. त्यामध्ये मुलीचा गर्भपात करणारा बाप दोषी आहेच पण पैशाच्या लोभापायी बेकायदा गर्भपात करणारा डॉक्टरही दोषी आहे. आणि समाज देखील तितकाच दोषी आहे.




सामाजिक कार्यकर्त्यांच्या आणि एनजीओच्या माध्यमातून लेखिकेचा आदिवासी लोकांशी व त्यांच्या जीवनपद्धतीची परिचय झाला. आता आदिवासींची मुलं आश्रम शाळेत जायला लागली आहेत. अनेक आदिवासी गावांचा पावसाळ्यात संपर्क तुटतो. त्यांना उपवास घडतात. पण आदिवासी वेदनेचे भांडवल करत नाहीत. ते आनंदाने, मानाने, जिंदादिल आयुष्य जगतात. आदिवासी समाजात मातृसत्ताक पद्धती आहे. बलात्कार, तलाक व विवाहबाह्य संबंध यांचे प्रमाण अत्यंत कमी आहे.

लेखिका रजियाजी म्हणतात स्त्रियांवरील कौटुंबिक हिंसाचाराचे मोठे कारण म्हणजे त्या आर्थिक दृष्ट्या दुसऱ्यावर अवलंबून असतात. म्हणून मुलींना शिकवले पाहिजे. त्या आर्थिक दृष्ट्या सक्षम व आत्मनिर्भर हव्यात.

रजियाजीनी हे पुस्तक विद्याताई बाळ यांना समर्पित केले आहे. विद्याताई बाळ यांचे विचार सांगणारा एक लेख पुस्तकात आहे. विद्याताई नेहमी म्हणायच्या आयुष्याला एवढे गोंजारत का बसायचे? कंटाळा न करता आयुष्य जगा. मृत्यू जवळ आला की आनंदाने सामोरे जा. याच विचाराने त्या जगल्या. दवाखान्यात गंभीर आजाराने भरती असताना कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त उपचार न घेता त्यांनी देह सोडला. इच्छा मरण ही चळवळ त्यांनी आपल्या लेखणीतून समाजाभिमुख केली आहे. वेदनेचे भांडवल न करता वागणं, बोलण्यात गोडवा, मनात प्रेम, वागण्यात नम्रता आणि लेखणीची जाण त्यांना होती. लेखिका म्हणते आपला जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन खेळकर हवा. साधं सोप्प जगावं. दिलखुलास असावं. न लाजता राहावं. राग आला तर आपल्या माणसांवर चिडावं पण मनात राग ठेवू नये. ज्यांना आपली गरज आहे त्यांना मदत करावी. ज्यानी आपल्याला दुखावल आहे त्यांना क्षमा करावी. आयुष्यातील आनंद जोपासण्यातच शहाणपण आहे.

सुरेश भटानी म्हटल आहे
'आयुष्य छान आहे, थोडं लहान आहे
रडतोस काय वेड्या, लढण्यात शान आहे'

# अरविंद केजरीवाल : अत्यंत लबाड माणूस



प्रकाश महागावकर
संपर्क क्र. 9422007361

आधुनिक केसरी

**एक टर्म पूर्ण झाल्यावर दुसऱ्यांदा घवघवीत यश मिळताच केजरीवालांची महत्वाकांक्षा वाढत गेली. त्यांना केंद्रशासित राज्य ओझे वाटायला लागले आणि पूर्ण राज्य मिळावे म्हणून ते धडपडायला लागले. मग पंजाब, गोवा आणि हरियाणासह त्यांनी गुजरातला धडका द्यायला सुरुवात केली. चुकून त्यांना पंजाब मध्ये यश मिळाले. भगवंत मान यांना मुख्यमंत्री करताना भविष्यात सहा-आठ महिन्यांनी तेथील मुख्यमंत्रीपद स्वतः कडे घेण्याचा मनसुबा त्यांचा आहे. भगवंत मान यांचा इतिहास किंवा पूर्वाध्याय तितकासा चांगला नाही. नशेची चटक असलेले, चोरीच्या आरोपाखाली तरूण वयात अटक झालेले, ड्रग्ज, मादक पदार्थांच्या तस्करीचाही संशय त्यांचेवर आहे. अशा बदनाम माणसाला पदावरून हटवणे अवघड जात नाही आणि कोणी बंडही करणार नाही त्यांचे संरक्षणार्थ.**

देशाची राजधानी दिल्ली, केंद्रशासित राज्य आहे. म्हणजे केंद्राचे अधिन राहून, राज्यपालांचे सहमतीने सरकार चालवणे अभिप्रेत असलेले अर्ध राज्य. या राजधानी शहरा अंतर्गत तीन महानगर पालिका आहेत. ज्या तीनही भाजपच्या ताब्यात आहेत. देशाची राजधानी असल्याने महत्वाचे शहर आहे.

या दिल्ली राज्यात गेली दोन टर्म अरविंद केजरीवाल संस्थापक असलेल्या आप या राजकीय पक्षाची सत्ता आहे. अभूतपूर्व आणि दैदिप्यमान यश दोन्ही निवडणूकांमध्ये आप ने मिळवले होते. आण्णा हजारेंच्या लोकपाल नियुक्ती साठीच्या आणि भ्रष्टाचाराच्या विरोधातील आंदोलनातून राजकीय क्षेत्रात आलेल्या कांही मोजक्या लोकांमधील अरविंद केजरीवाल एक होत. किरण बेदी, योगेंद्र यादव, मणिष सिसोदिया आणि केजरीवाल हे राजकारणात आले. कवी मनाचे अत्यंत तौलनिक बुध्दीचे, अभ्यासू व्यक्ती कुमार विश्वास हे लवकरच अरविंद केजरीवाल आणि राजकीय क्षेत्र यापासून दूर गेले. कारण सच्चा मनाच्या धार्मिक अभ्यासकाला, कवीमनाच्या कोमल हृदयधारकाला राजकारणातला बेशरमपणा झेपणारा नव्हता.

या केजरीवालने प्रचलीत राजकारणात सक्रिय नसलेल्या, नवीन, सुशिक्षित चेहऱ्यांना समोर करून लोकांना भूरळ पाडली. शिवाय करप्शन विरोधात मोठमोठी भाषणे ठोकत जनतेच्या मनात जागा निर्माण केली. मणिष सिसोदिया यांनी खरोखरच शैक्षणिक पध्दतीत आणि शिक्षण क्षेत्रात अभुतपूर्व सुधारणा करुन वाहवा मिळवली आहे. पण एक टर्म पूर्ण झाल्यावर दुसऱ्यांदा घवघवीत यश मिळताच केजरीवालांची महत्वाकांक्षा वाढत गेली. त्यांना केंद्रशासित राज्य ओझे वाटायला लागले आणि पूर्ण राज्य मिळावे म्हणून ते धडपडायला लागले. मग पंजाब, गोवा आणि हरियाणासह त्यांनी गुजरातला धडका द्यायला सुरुवात केली. चुकून त्यांना पंजाब मध्ये यश मिळाले. भगवंत मान यांना मुख्यमंत्री करताना भविष्यात सहा-आठ महिन्यांनी तेथील मुख्यमंत्रीपद स्वतः कडे घेण्याचा मनसुबा त्यांचा आहे.

भगवंत मान यांचा इतिहास किंवा पूर्वाध्याय तितकासा चांगला नाही. नशेची चटक असलेले, चोरीच्या आरोपाखाली तरूण वयात अटक झालेले, ड्रग्ज, मादक पदार्थांच्या तस्करीचाही संशय त्यांचेवर आहे. अशा बदनाम माणसाला पदावरून हटवणे अवघड जात नाही आणि कोणी बंडही करणार नाही त्यांचे संरक्षणार्थ.

आपण पंजाबमध्ये सक्रीय व्हावे आणि दिल्लीची सत्ता आपल्या साडूच्या किंवा मणिष सिसोदिया यांचे हातात सोपवावी असा त्यांचा मनोदय होता. पण आता मणिष सिसोदियासह तीन चार विश्वासू साथीदार भ्रष्टाचाराच्या आरोपात बुडाल्यामुळे केजरीवाल हैराण झाले आहेत. शिक्षण क्षेत्र अमुलाग्र बदलताना भारतीय रक्त दोषामुळे हाव, लालच, लोभ मुळ धरायला लागला आणि मग पहील्या टर्ममध्ये जो स्वच्छ कारभार आणि मोफत सुविधांची खैरात केली होती ती गुंडाळून ठेवून राजकारणात मुरले. आणि दुप्पट तिप्पट वेगाने करप्शनला वाव देत गेले.

आप नवीन पक्ष असूनही चारपाच राज्यांमधून निवडणुकांना सामोरे जाताना लागणारा पैसा आणणार कोठून हा प्रश्न उभा राहीला. मग सर्वांकडे आलीशान गाड्या आल्या सरकारी अद्ययावत बंगले मिळाले. जनतेच्या पैशांवर ऐश सुरू झाली. मोदी विरोधात काशी (बनारस, वाराणसी) येथून निवडणूक लढवली. हसे करून घेतले. आता चार आमदार अडकले, ते रडारवर



आल्यामुळे दहा पावले केजरीवाल मागे आले.

दिल्लीचे मुख्यमंत्रीपद सांभाळताना ते कायम केंद्राशी आणि राज्यपालांशी पंगा घेतात. एक कृष प्रकृतीचे नवराजकारणी, सतत खोकल्या पडश्याने हैराण असलेले अरविंद केजरीवाल यांना नरेंद्र मोदींनी सल्ला देऊन कर्नाटक राज्यात ट्रीटमेंट घ्यायला लावली आणि ते एकदम ठणठणीत झाले. एका मिरवणूकीत एका सामान्य माणसाने हार घालण्याचे नाटक करत गाडीवर चढून थोबाडीत मारली तरी तो मार केजरीवालांनी हसत हसत सहन केला एवढी त्यांची प्रकृती सुधारली. आता त्यांनी छान बाळसे धरले आहे. सुख माणसाने लपवायचा कितीही प्रयत्न केला तरी ते उजागर होतेच, तसे नैसर्गिक रित्या अरविंद केजरीवाल सदृढ झाले.

पंजाब जिंकल्यावर गोवा, हरियाणा येथे प्रयत्न करून पाहीले. पण यश आले नाही, आता त्यांनी गुजरात मनावर घेतले आहे. बघूया तीथे काय दिवे लावतात ते. परंतू एक मात्र खरे की या एक दिड वर्षात आपच्या केजरीवाल सरकारची बरीच भ्रष्ट प्रकरणे उजागर होत आहेत. चार दिवसात सिसोदिया यांना अटक होईल आणि केजरीवाल जास्तच आक्रस्ताळेपणा करू लागतील.

बस प्रवास मोफत, विज 300 युनिट फुकट, मुसलमानांना अनेक सवलती, मदरशांचे कर्मचाऱ्यांना वारेमाप भरघोस पगार देणे या योजनांचे नावा खाली बोगस संख्या दाखवत गैरमार्गाने कमाई चालू आहे. तरीही एक मात्र खरे आहे की भाजपा आणि केंद्र सरकार कितीही स्पष्टीकरण देत असले आणि ईडी, सीबीआय, हे कायदेशीर कारवाई करत आहे, असे सांगितले तरी फक्त विरोधकांनाच टारगेट करत आहेत असे चित्र दिसत आहे. परवा परवा बिहारमध्ये जी छापेमारी झाली ती नवीन सरकार स्थापन व्हायच्या आधी झाली असती तर क्षम्य होती. पण नितीशकुमार यांनी भाजपची संगत सोडून आरजेडीशी आघाडी करून सरकार स्थापन केल्यानंतर लालू प्रसाद कुटूंब आणि जवळचे त्यांचे विश्वासू मीत्र, नातेवाईक यांचेवर या धाडी पडल्याने थोडी शंका निर्माण होत आहे. आणि ही मंडळी भ्रष्ट आहेत, यांनी देशाला लुटलेले आहे. वाम मार्गाने लुट केली आहे, हे विसरून भाजप सूड घेत आहे असे वातावरण निर्माण करण्याचे प्रयत्नात विरोधक आहेत. त्यामुळे अरविंद केजरीवाल आणि कंपनीला सज्जड पुराव्यांसह अडकवले पाहीजे, नुसत्या नोटीसा बजावून उपयोग नाही. लवासा प्रकरणातील नोटीसांना पवार कुटुंबाने उत्तर दिल्याचे ऐकीवात नाही.

# गुणवत्तेच्या सुवर्ण प्रवासातील महामेरू



सुनील मोरे
जि.प.प्रा. शाळा.
पिंपळगाव, ता. हदगाव

आधुनिक केसरी

**आपले शैक्षणिक कार्य धसास लावणारे आ. श्री.शंकर पंगेरवाड सर दि. 31/08/2022 रोजी सेवानिवृत्त होत आहेत.जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपळगाव कें. येवली, ता. हदगाव जि. नांदेड या शाळेला गुणवत्तेच्या उच्च शिखरावर पोहोचवून नांदेड जिल्ह्यात नावलौकिक त्यांनी मिळवून दिला. उत्तम हस्ताक्षर, वाचनाची विशेष आवड, विद्यार्थ्यांमध्ये रममान होऊन अध्यापन करणे, मनमिळावू स्वभाव, अडीअडचणीत इतरांना मदत करणे, सरळमार्गी आयुष्य जगणे आणि प्रत्येकाच्या सुखदुःखात हिरीरीने सहभाग घेणे असे काही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष पैलू सांगता येतील.**

मन शुद्ध तुझं गोष्ट हाय
पृथ्वी मोलाची,
तू चाल पुढं तुला रं गड्या भीती कशाची,
पर्वा बी कुणाची..!

याप्रमाणे आपले शैक्षणिक कार्य धसास लावणारे आ. श्री.शंकर पंगेरवाड सर दि. 31/08/2022 रोजी सेवानिवृत्त होत आहेत. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपळगाव कें. येवली, ता. हदगाव जि. नांदेड या शाळेला गुणवत्तेच्या उच्च शिखरावर पोहोचवून नांदेड जिल्ह्यात नावलौकिक त्यांनी मिळवून दिला.आपल्या 36 वर्षांच्या दैदीप्यमान कारकीर्दीत गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा वसा घेऊन वंचित, गरीब, गरजु व दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना सतत मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना आयुष्याविषयी त्यांनी सकारात्मक विचार करायला लावला. महाराष्ट्र आणि तेलंगना सीमेवर असलेल्या किनी ता. भोकर या ठिकाणी एका सामान्य मध्यमवर्गीय कुटुंबात त्यांचा 15 ऑगस्ट 1964 मध्ये जन्म झाला. बालवयात आजीच्या संस्कारात ते वाढले. त्यांचे इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतचे शिक्षण जिल्हा परिषदेत हायस्कूल किनी ता. भोकर या ठिकाणी झाले. नंतर शासकीय अध्यापक विद्यालय हदगाव या ठिकाणी शिक्षणशास्त्र पदविका प्राप्त केली. नांदेडला वसंतराव नाईक विद्यालयात पदवीचे शिक्षण तर अलाहाबाद विद्यापीठातून शिक्षणशास्त्र पदवी प्राप्त केली. ' जोपर्यंत नापास होत नाही तोपर्यंत शिका' अशी आदेशवजा शिकवण त्यांच्या वडिलांनी त्यांना दिली होती. ती त्यांनी शिरसावद्य मानून त्यांनी शिक्षण घेतले. जिल्हा परिषद हायस्कूल मांजरम, ता. नायगाव या ठिकाणी सहशिक्षक म्हणून दि. 25 जुलै 1986 रोजी त्यांची प्रथम नियुक्ती झाली. व्यक्तिमत्व विकासासाठी आवश्यक असलेले बहुतांश पैलू या ठिकाणी त्यांच्यात निर्माण झाले. याठिकाणी ग्रंथालयाचा पदभार त्यांच्याकडे होता आपसूकच अनेक चांगली पुस्तके त्यांच्या वाचनात आली. सुट्टीच्या दिवशी सकाळी हाती घेतलेले पुस्तक सायंकाळपर्यंत वाचन केल्याचेही ते अभिमानाने सांगतात. खो-खो, कबड्डी,लेझीम यांसारख्या खेळांमध्ये त्यांना विशेष आवड आहे. अस्सल भारतीय मैदानी खेळाविषयी त्यांच्या मनात प्रचंड आदर आहे.आपल्या शाळेतील खो-खो चा संघ राज्यस्तरावर खेळल्याचा ते विशेष अभिमान बाळगतात. भारताचे तत्कालीन संरक्षण मंत्री जॉर्ज फर्नांडिस यांच्या हस्ते एका समारंभात भारत स्काऊट मध्ये उत्तम कामगिरीबद्दल त्यांना प्रशस्तीपत्र मिळाले होते.भावंडांमध्ये थोरले असल्यामुळे त्यांच्या शिक्षण प्रेमाचे धाकट्या भावंडांवर प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सकारात्मक शैक्षणिक परिणाम झाले.त्यांचे तीन धाकटे भाऊ अनुक्रमे नागेश्वर पंगेरवाड हे निघवा येथे पोस्ट ऑफिसमध्ये पोस्टमास्तर, सुदर्शन पंगेरवाड हे शासकीय ज्युनियर कॉलेज पेदापेल्ली येथे प्राचार्य तर सर्वांत धाकटे भाऊ मनोहर पंगेरवाड हे भारतीय सैन्यात असिस्टंट मेजर या पदावर आहेत.भारत - पाकिस्तान युद्ध,भारत - चीन



युद्ध आणि एकूणच भारतीय सैन्यांनी केलेल्या यशस्वी कार्यवाही बद्दल सांगताना त्यांचा उर देशभक्तीने भरून येतो.राष्ट्रीय प्रतिके,भारताचा जुना वारसा, प्रेक्षणीय स्थळे,मंदिरे,भारतीय पर्यटन स्थळे याविषयी ते फार आत्मीयतेने बोलतात.मांजरम येथील सेवेनंतर त्याची बदली जिल्हा परिषद हायस्कूल पाळज ता.भोकर या ठिकाणी झाली.अल्पावधीतच त्यांनी मुख्याध्यापक पदाचा पदभार स्वीकारला. नांदेडचे तत्कालीन जिल्हाधिकारी डॉ.श्री. श्रीकर परदेशी साहेब यांनी आणलेल्या ' कॉपीमुक्त अभियानात ' त्यांनी हिरीरीने सहभाग घेतला आणि उपविभागीय अधिकारी श्री. राजेंद्र खंदारे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पाळज हायस्कूलचा इयत्ता दहावीचा सर्वोत्तम निकाल प्राप्त केल्याचा त्यांना अभिमान आहे. त्यांचे पाळज येथील अनेक विद्यार्थी आज अधिकारी पदावर आहेत.जनगणना,निवडणुका आणि कोरोनासारख्या आपत्कालीन स्थितीमध्ये त्यांनी सर्वोत्तम काम केल्याचे सांगतात. निजाम काळामध्ये ' सोन्याची किनी ' असलेले किनी गाव उध्वस्त झाले परंतु तरीही ग्रामस्थांनी राखलेला संयम आणि पुन्हा स्थापन केलेले गाव याबद्दल ते संवेदनशील असतात. मे,2011 यावर्षी पदोन्नत मुख्याध्यापक म्हणून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपळगाव येथे त्यांना बढती मिळाली. पिंपळगाव शाळेचा खऱ्या अर्थाने कायापालट त्यांच्या कारकिर्दीत झाला. तालुक्यात दोन प्रोजेक्टर असणारी आणि उत्तम संगणककक्ष असणारी पिंपळगावची शाळा हदगाव तालुक्यातील एकमेव शाळा असावी.शिष्यवृत्ती, नवोदय, एन.एम.एम.एस., चित्रकला,स्काऊट- गाईड,लेझीम,मैदानी खेळाच्या स्पर्धा आणि योगा इ.अनेक स्पर्धांमध्ये त्यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपळगावला सर्वोच्च नावलौकिक मिळवून दिला.अत्यंत झपाट्याने व प्रचंड वेगाने त्यांनी पिंपळगाव याठिकाणी काम केले.आपल्या सहकाऱ्यांतील सर्वोत्तम गुण हेरून त्यांना योग्य ती जबाबदारी देऊन प्रेमाने कामे करून घेतली.

या शाळेतील संगणक कक्ष,लेझीम पथक,बँड पथक,स्काऊट-गाईड पथक,दरवर्षी होणारा सांस्कृतिक कार्यक्रम,शाळेची देखणी रंगरंगोटी,शाळेतील विद्युतपुरवठा अखंडितपणे सुरू ठेवण्यासाठी केलेले यशस्वी प्रयत्न,शाळा डिजिटल करण्यासाठी लोकावाटा जमा करण्यासाठी त्यांनी केलेला प्रवास,शालेय परिसर स्वच्छ राहण्यासाठी घेतलेला सहभाग इ.कृती शाळेला उच्च पदावर पोहोचण्यास मदत करतात. एका वर्षी इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्ह्यातून सर्वाधिक विद्यार्थी पिंपळगाव शाळेचे उत्तीर्ण झाल्याचा त्यांना अभिमान आहे.यावर्षी एन.एम.एम.एस या राष्ट्रीय आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी असलेल्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या दहा विद्यार्थ्यांना त्यांनी प्रत्येकी दहा ग्रॅम शुद्ध चांदीचे पदक स्वखर्चातून भेट दिले.साधी राहणी,पण उच्च विचारसरणीमुळे त्यांचे आगळेपण लक्षात येते.अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले,स्वतः किनवटला जाऊन पाठपुरावा केला व शिष्यवृत्ती मिळवून दिलीच. विद्यार्थ्यांत रममाण होऊन - जमिनीवर बसून स्वतःचित्र काढलीत.बोधडी ता.किनवट येथे शासकीय रेखाकला परीक्षामध्ये विद्यार्थ्यांना प्रविष्ट केले.इंग्रजी आणि गणित या कठीण वाटणाऱ्या विषयांमध्ये त्यांना विशेष रस आहे.अनेक अवघड गणितीकोडे ते चुटकीसरशी सोडवत होते.इंग्रजी,मराठी,हिंदी आणि तेलुगु या भाषांवर त्यांचे विशेष प्रभुत्व आहे. या सर्व शैक्षणिक व्यापातही अध्यात्माची नाळ मात्र त्यांनी कधी तुटू दिली नाही. दादा अर्थात पांडुरंग शास्त्री आठवले यांनी स्थापन केलेल्या ' स्वाध्याय ' परिवारात ते मागील बऱ्याच वर्षांपासून सक्रिय आहेत. आसपासच्या खेड्यांतील सदस्यांना मार्गदर्शन करण्यासाठी ते सतत प्रयत्नशील असतात. व्यक्तीतील चांगले गुण तेवढे घ्यावे, त्या गुणांचा जाहीर सन्मान करावा तर त्रुटी एकांतात सांगाव्यात असे ते म्हणतात.त्यांचा मुलगा चि.बनेश्वर अभियांत्रिकी पदवीधर आहे तर मुलगी सौ.दक्षजाकुमारी निर्मल येथे सुखीसंसारात आहे.आई-वडिलांचे कर्तृत्ववान पुत्र,पाल्याचे जबाबदार पालक, विद्यार्थ्यांचे लाडके गुरुजी,सहकाऱ्यांचे आवडते मुख्याध्यापक,मित्रांचे जिवलग मित्र तर ग्रामस्थ आणि सर्वसामान्यांसाठी निखळ हास्यवदन असलेला साधा-सरळ माणूस म्हणून त्यांची ख्याती आहे.या आयुष्याच्या प्रवासातील प्रत्येक चढउतारात त्यांच्या सहचारीणी सौ.शारदाताई यांची अत्यंत मोलाची साथ त्यांना लाभली.ग्रामपंचायत,सेवा सहकारी सोसायटी,जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपळगाव,शालेय व्यवस्थापन समिती पिंपळगाव,संकुल येवली आणि समस्त गावकरी मंडळी पिंपळगाव तर्फे श्री.शंकर सदाशिवराव पंगेरवाड सरांना सेवापूर्ती निमित्त लक्ष-लक्ष हार्दिक शुभेच्छा.त्यांचे भावी आयुष्य हे सुख-समाधानाचे,निरोगी आणि भरभराटीचे असो अशी ईश्वरचरणी प्रार्थना.

# 'प्रेमळ काका' : श्री ग. प्र. प्रधान

आधुनिक केसरी

जेष्ठ स्वातंत्र सैनिक, समाजवादी विचारवंत, हाडाचे शिक्षक, इंग्रजीचे नामवंत प्राध्यापक, तेवढेच प्रेम मराठी भाषेवर, लेखन कौशल्याने साहित्य क्षेत्रात अढळस्थान निर्माण केलेले व्यासंगी विद्वान लेखक, जीवनाकडे व आपल्या ध्येयाकडे नितांत श्रध्दा असणे हा सद्गुण त्यांच्याकडे होता. असे हे बहुआयामी व्यक्तिमत्व असणारे प्राध्यापक श्री. प्रधान सर हे माझे काका होते. त्याचं कारण असं की त्यांचे वडील इंदापूरला काही काळ वास्तव्यास होते. माझे वडील व काका शाळेतले बालमित्र होते. पुढे त्यांच्या वडीलांच्या बदलीमुळे त्यांनी इंदापूर सोडले, पण ध्येयाने प्रेरीत हे दोन तरूण येरवडा कारागृहात परत एकत्र आले. दोघांचे ध्येय एकच होते ते म्हणजे "भारत स्वतंत्र व्हावा" 1942 च्या "चले जाव चळवळीत" अवघ्या 20 वर्षाचे मिसरूड फुटलेले हे दोघे ध्येयवादी तरूण येरवडा कारागृहात राजकीय बंदीवासात होते. साने गुरूजी व महात्मा गांधींच्या विचाराने झपाटलेले होते.

मला सांगायला आनंद होतो की 20 वर्षे पुण्यातील फर्ग्युसन कॉलेजमध्ये इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून काम केल्यावर ते समाजकल्याण व्हावे या हेतूने राजकारणात आले. विरोधी पक्षनेता होते तेव्हा त्यांना "मलबार हिल"वर बंगला रहायला मिळाला होता, पण सर्वसामान्य लोकांना त्यांच्याकडे यायला मिळावे म्हणून त्यांनी मंत्रालयाच्या भागातला साधा बंगला रहायला घेतला. त्यात सर्वसामान्य लोकांची सतत वर्दळ असायची, पण पेशाने डॉक्टर असलेल्या मालविका काकूदेखील काकांच्या प्रत्येक कार्यात त्यांना साथ देण्यासाठी सदैव तत्पर असायच्या.अश्या या पतिव्रता काकू तुम्ही माझ्यासाठी एक आदर्शवादी व्यक्ति आहात.

लेखन हा लेखकाच्या व्यक्तिमत्वाचा अविभाज्य भाग असतो असे त्यांचे विचार होते. 18 वर्षे आमदार, 2 वर्षे विरोधी पक्षनेता म्हणून काम केले तेव्हा प्रत्येकाला काका आपला माणूस आहे असे वाटायचे. फर्ग्युसन कॉलेजमध्ये ॲंफी थेएटरमध्ये काकांच्या लेक्चरला फर्ग्युसन व्यतिरिक्त वाडीया, गरवारे, मॉडर्न कॉलेजचे विद्यार्थी पण यायचे यावरून त्यांची विद्यार्थी प्रियता लक्षात येते. समाजाच्या, विद्यार्थ्यांच्या कक्षा रूंदावत असे हे समाज शिक्षक होते. मालविका काकूंच्या निधनानंतर रहाते घर साधना साप्ताहिकाला दिले व स्वतः साने गुरूजींच्या दवाखान्यात 404 खोलीत रहायला गेले. तिथेही त्यांनी देहदान केले. ठाणे जिल्ह्यातील मुरबाड येथे 26 ऑगस्ट1922 साली काकांचा जन्म झाला. त्यांच्या जन्मशताब्दीचे हे वर्ष व त्याच्या सांगता समारंभा निमित्ताने शतशः वंदन करते.

**"थोर महात्मे होऊन गेले प्रयत्न त्यांचे पहा जरा।।**
**आपण त्यांच्या समान व्हावे हाच सापडे बोध खरा "।।**

अशा प्रेमळ,मायाळू काकांच्या सहवासात मला खूप काही शिकायला मिळाले यासाठी मी स्वतः ला भाग्यवान समजते. शतःकोटी वंदन काका.

**-सौ. ऊज्वला धर्माधिकारी, पुणे.**

# हरतालिका व्रत व पूजन

आधुनिक केसरी

**श्रावण महीना संपला तसा पिठोरी अमावस्येनंतर भाद्रपद महीना सुरु झाला भाद्रपदातील पहिला आणि शेवटचा वर्षातून एकदा येणारे सर्वात मोठे व्रत म्हणजे हरतालिका व्रत जसी अमावस्या संपते तश्या स्त्रिया व मुली हारतालिका व्रत पूजनाच्या तयारिला लागतात नवीन कोरी साड़ी साज श्रृंगार, पूजेचे साहित्य खरेदीला वेग लागतो. हारतालिका हे व्रत पार्वतीने भगवान शंकरांना मिळवण्यासाठी केले होते तिचे भगवान शंकरांवर खूप प्रेम होते तिने ठरवले होते की लग्न करेल तर शंकरांसोबतच करेल.**

एकदा पार्वती वनातून जात असताना तिला ऋषिमुनि भेटले त्यांनी तिला सांगितले की तु हारतालिका व्रत कर तुझ्यावर नक्की महादेव प्रसन्न होतील. पार्वती विचारात पडली मग ऋषिमुनी बोलले काय झालं कसला विचार करते. तेव्हा पार्वती बोलली पण गुरुदेव मला एवढे ज्ञात नाही की मी हे व्रत कसे करू, तुम्ही मला या हारतालिका व्रताविषयी संपूर्ण माहिती सांगितली तर मी करू शकेल. तेव्हा ऋषिमुनिनी पार्वतीला सांगितले तू दिवसभर फक्त फलआहार करून उपवास कर वाळूची शिवलिंग तयार कर त्याचा दूध, तूप, दही, मध पंचअमृत ने अभिषेक कर नंतर बेलपत्र, फुल, पान, आणि महत्वाचे म्हणजे थोत्रा, फुल अन फळ असन खूप गरजेच आहे. कारण शिवाला हे अतिप्रिय आहे आणि भगवान शंकराच्या नावाचा जप कर. पार्वतीने ऋषिमुनिचे आभार मानले ऋषिमुनिनी सांगितल्याप्रमाणे पार्वतीने हारतालिका व्रत केले. तिने वाळूचे शिवलिंग तयार केले. दुरून नदिवरुन पानी आणले. खूप कडक व्रत असल्याने तिला चक्कर येऊ लागली.दूर उभे असलेले ऋषिमुनि आणि नारदमुनि पार्वतीची पूजा बघत होते. त्यांनी तिला समजावले, पण पार्वती थांबली नाही तिने पूर्ण श्रद्धेने हारतालिका व्रत पूर्ण केले. मनोभावे पूजन केले. तिची श्रद्धा व भक्ति पाहून भगवान शंकरांना पण प्रकट होऊन तिला दर्शन द्यावे लागले. जेव्हा तिला विचारले तुझी इच्छा काय आहे तर तिने सांगितले



की मी आपल्याला पती म्हणून स्वीकारले आहे. आपण मला पत्नी म्हणून स्वीकाराल का? तिच्या भक्तिसामोर सर्व फिके पडले. भगवान शंकरांनी पार्वतीसोबत विवाह केला अन् तिला आपल्यासोबत घेऊन गेले. म्हणून आजही ज्या कुमारीका हे व्रत करतात. त्यांना मनोइच्छीत वर प्राप्ती होते. शास्त्रात, पूराणात असेही लिहलेले आहे की हे हरतालिका व्रत एकदा सुरु केले की मरेपर्यंत करावेच लागते. कितीही अडचणी आल्या तरी मोडावे लागत नाही जर कधी कोणी मोडले तर गाढवाचा जन्म मिळतो. सहसा करून स्त्रिया असो किंवा मुली हे व्रत मोडत नाहीत.हारतालिका व्रतदिनी महादेवाच्या मंदिरात स्त्रिया आणि मुलींची प्रचंड गर्दी बघवयास मिळते. हारतालीकेच्या दिवशी सकाळी लवकर उठून सर्व पूजेच साहित्यि एका ठिकाणी काढून ठेवले जाते.मग नंतर छानपैकी

**कविता चव्हाण**
**म्हसावद, जळगाव**

नटुन-थटून स्त्रिया व मुली मंदिरात पूजेला जातात. त्या ठिकाणी ब्राम्हणाच्या हाताने मध्यभागी वाळूचे शिवलिंग तयार करून आजुबाजूला वतृळाकार बसून मनोभावे पूर्ण श्रद्धापूर्वक पूजन केले जाते. नंतर घरी आल्यावर तुळशिला पानी टाकून पूजा करून नंतर फळ, राजगिरा लाडु उपवासाच खाऊंन दिवसभर व्रत ठेवले जाते. संध्याकाळी पण फक्त फलआहार करूनच राहावे लागते. नंतर दुसऱ्या दिवशी सकाळी ज्या मंदिरात पूजा केलिए त्या मंदिरात जाऊंन तिथल्या ब्राम्हणाला शिदा आटा देऊन घरी आल्यावर स्वयंपाक करून व्रत सोडले जाते असा हा हारतालिकेचा उपवास घराघरातील स्त्रीया व मुली करतांना दिसतात.



औरंगाबाद : विशाल नगर येथील कुंभार समाजातील व्यवसायिकांना गजानन मंदिर भागात व्यवसायासाठी दर वर्षीप्रमाणे विधानसभा संघटक तथा मा.स्थायी समिती सभापती महानगरपालिका राजु वैद्य यांनी मोफत जागा उपलब्ध करून दिल्याने व्यावसायिकांनी वैद्य यांच्या हस्ते दुकानाचे उदघाट्न केले व व्यावसायिकांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी अखिल शेख, अनिल ढवळानपुरे, विश्वनाथ दांडगे, प्रेमचंद महतोले, रामा ढवळानपुरे, रामेश्वर पालय, रणजित ढवळानपुरे, सुनील ढवळानपुरे, गजानन ढवळानपुरे, सोनू अहिले, धनराज महातोले, विष्णू पालईये, गौरव ढवळानपुरे, विठ्ठल जोरले, गणेश बगळे, रमेश काथार, बालाजी काथार, सागर साळुंके, शुभम डोंगरे, राजेश मुळे, धनराज महतोले, प्रमोद ढवळानपुरे, राम केकान, संदीप अहिरे, शुभम साळवे, बंटी कचकुरे आदींची उपस्थिती होती.

## विस्तार अधिकारी मोरे यांना सामाजिक भूषण पुरस्काराने सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** एम.सी.एन.न्युजच्या नवव्या वर्धापण दिनानिमित्त 28 ऑगस्ट रोजी सहकार विद्यामंदिर जळगाव जामोद येथे पार पडलेल्या कार्यक्रमात जळगाव जामोद पंचायत समितीचे विस्तार अधिकारी संदिप मोरे यांना त्यांच्या कार्यात विशेष उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल एम.सी.एन. न्यूजच्या वतीने सामाजिक भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला.
दरवर्षी एम.सी.एन.न्यूजच्या वतीने सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करण्याऱ्या व्यक्तीचा चँनलचे मुख्य संपादक श्यामकुमार तायडे, संपादक राजीव वाढे यांच्या वतीने सामाजिक भूषण पुरस्कार प्रदान केल्या जातात. यावर्षी सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात आपल्या कार्यकतृत्वाचा ठसा उमटविणाऱ्या, आपल्या पदाला, कार्याला प्रामाणिक राहून, शासकीय सेवेत एक उच्च पदस्थ अधिकारी असताना समाजभान जपत कार्य करणारे पंचायत समितीचे विस्तार अधिकारी संदिप मोरे, शिक्षण विस्तार अधिकारी फाडके, अकोला जिल्ह्यातील महान पिंजर येथील जीवरक्षक संत गाडगे बाबा आपत्कालीन शोध बचाव पथकाचे प्रमुख दीपक सदाफळे यांना यावेळी सामाजिक भूषण गौरव पुरस्कार देवून सन्मानित



करण्यात आले.
खऱ्या अर्थाने कार्यक्रमाचे वैशिष्ट्य ठरला विस्तार अधिकारी संदिप मोरे यांचा पुरस्कार सोहळ्याच तो क्षण... सर्वांचे लक्ष वेधून घेणारा तो क्षण याची देही यांची डोळा सर्वांनी अनुभवला. सोशल मिडिया आणि प्रसार माध्यमाबाबत जेव्हा या पुरस्काराबद्दल जळगाव जामोद तालुक्यातील ग्रामीण, आदिवासी भागात जेव्हा संदीप मोरे यांना पुरस्कार मिळणार ही बातमी समजली, तेव्हा आदिवासी बांधव, अनेक लाभार्थी, ग्रामस्थ, ग्रामसेवक, केंद्र चालक, रोजगार सेवक, सर्व ग्रामपंचायतीचे कर्मचारी, सर्व सरपंच व संघटना यांच्यासह यांना मानणाऱ्या सर्व लोकांना आनंद झाला ऐवढेच नाही प्रत्यक्ष पुरस्कार प्रदान करण्याच्या दिवशी मोठ्या प्रमाणात उपस्थिती दर्शविली. यावेळी मोठ्या प्रमाणात सरपंच, ग्रामसेवक आणि ग्रामस्थ हजर होते.

## धुळे पोलिसांची मोठी कारवाई; 20 लाखाचा पानमसाला जप्त

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** इंदौर ते भिवंडी असा धुळे मार्गाने आयशर ट्रक मध्ये प्रतिबंधीत गुटख्याची महाराष्ट्र राज्यात विक्रीच्या उद्देशाने वाहतुक करत असताना ताब्यात घेतले. परराज्यातून महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला गुटखा पानमसाल्याची विक्री करण्याच्या उद्देशाने तस्करी होत असल्याने विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ.बी.जी शेखर, नाशिक परिक्षेत्र व पोलीस अधीक्षक प्रविणकुमार पाटील यांनी पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांना सुचना देऊन कारवाई करण्याचे आदेश दिले होते.
सदर आदेशानुसार माहिती प्राप्त करीत असताना हेमंत पाटील यांना गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशीर बातमी मिळाली. त्याअनुशंगाने खात्री करुन कायदेशिर कारवाई करण्याचे पथकाला आदेशित केले होते. स्था गुशा पथकाला सरबड़ फाटा येथे बातमी प्रमाणेचा आयशर ट्रक येताना दिसल्याने त्यास थांबवून त्यावरील चालकास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव बहादुर अंबाराम मावी सांगितले. क्लीनर कमल रमेश दांगी असे सांगितले. त्यास ट्रकमधील मालाबाबत विचारणा केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिल्याने ट्रकमधील मालाबाबत खात्री केली असता परचुटन मालासोबत पानमसाला मिळून आला. एकूण 30,57,200 रु. किं. चा मुझेमाल व 20,47,200 रु.किंमतीचा महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुगंधीत पानमसाला भिवंडी शहरात विक्री करण्याच्या उद्देशाने वाहतुक करतांना मिळुन आल्याने पुढील कारवाई करीता अन्न व औषध प्रशासन विभाग धुळे यांना पत्रव्यवहार करण्यात आला असून सोनगिर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.
सदरची कारवाई प्रविणकुमार पाटील पोलीस अधीक्षक, प्रशांत बच्छाव अपर पोलीस अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली पो.निरी हेमंत पाटील, बाळासाहेब सुर्यवंशी, रफीक पठाण, योगेश चव्हाण, पोकॉ सागर शिर्के, राहुल गिरी, कमलेश सुर्यवंशी यांनी केली आहे.



## शब्द शंकरपाळी काव्यसंग्रहाला २०२१ चा "सर्वोत्कृष्ट दिवाळी विशेषांक" पुरस्कार प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**नवी मुंबई :** दिवाळी अंक ही महाराष्ट्रातील एक सांस्कृतिक परंपरा असून ती अखंडपणे चालू राहावी व यातून दर्जेदार साहित्याची निर्मिती व्हावी यासाठी स्पंदन दिवाळी अंक स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यांतून आणि कानाकोपऱ्यातून स्पर्धकांनी या स्पर्धेत उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन आपले प्रतिनिधित्व केले होते. त्यामधून "शब्द शंकरपाळी दिवाळी विशेषांक काव्यसंग्रह २०२१" यास "सर्वोत्कृष्ट दिवाळी अंक" म्हणून नामांकन मिळाले. स्पंदन चॅरिटेबल ट्रस्ट महाराष्ट्र राज्य या संस्थेच्या वतीने सांस्कृतिक कार्यक्रम आणि पुरस्कार वितरण सन्मान सोहळा शनिवार दि.२७ ऑगस्ट २०२२ रोजी कराड येथे आयोजित करण्यात आला. सदर कार्यक्रमाचे आयोजन संस्थेचे संस्थापक संदीप डाकवे यांनी केले. या भव्यदिव्य कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून खासदार श्रीनिवास पाटील हे लाभले आणि त्यांच्या शुभहस्ते हा पुरस्कार सोहळा पार पडला.
सदर पुरस्कार सोहळ्यात विविध पुरस्कार दिले गेले त्यापैकी विशेष म्हणजे राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धा २०-२०२१. यामध्ये "शब्द शंकरपाळी दिवाळी विशेषांक काव्यसंग्रह २०२१" यांस "सर्वोत्कृष्ट दिवाळी अंक" पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. पुरस्काराचे स्वरूप म्हणजे स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र, फेटा आणि काव्यसंग्रह देण्यात आला. तसेच शब्द शंकरपाळी या काव्यसंग्रहाचा विशेष उल्लेख करून कौतुकही करण्यात आले. काव्यसंग्रहाच्या सहसंपादिका अवंतिका महाडिक यांनी उपस्थित राहून हा पुरस्कार स्वीकारला. या सोहळ्यात महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यांतून स्पर्धकांनी, रसिकांनी, वेगवेगळ्या संस्थानी आवर्जून उपस्थिती लावून या कार्यक्रमाची शोभा वाढवली तसेच कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यात अमूल्य सहकार्य केले.

## २४६ ज्येष्ठांनी केला लालपरीने मोफत प्रवास

आधुनिक केसरी न्यूज

**देव्हारी :** राज्य शासनाने ७५ वर्षांवरील जेष्ठ नागरिकांना एसटीच्या सर्व सेवांमधून मोफत प्रवास करता येईल अशी घोषणा केली. रविवारपर्यंत औरंगाबाद विभागाच्या सोयगाव बस आगाराच्या बसमध्ये ७५ वर्षांवरील २४६ ज्येष्ठांनी लालपरीने प्रवास केल्याची माहिती प्रशासनाने दिली. एसटी महामंडळाच्या सोयगाव आगाराच्या शुक्रवारी २६, शनिवारी ९९, तर रविवारी १०६ दुपारच्या २:०० पर्यंत ७५ वर्षांवरील एकुण २४६ ज्येष्ठांनी लालपरी म्हणजे एसटी बसमधून मोफत प्रवास केला. या योजनेचा बुधवारी विधिमंडळाच्या अधिवेशनादरम्यान शुभारंभ झाल्यानंतर एसटी महामंडळ प्रशासनाने परिपत्रक जारी केले आहे. या मोफत बस प्रवासासाठी नागरिकांना आधार कार्ड, पॅनकार्ड, वाहन परवाना, निवडणूक ओळखपत्र किंवा केंद्र आणि राज्य शासनातर्फे निर्गमित केलेले ओळखपत्र यापैकी कुठलेही एक ओळखपत्र वाहकाला दाखविल्यास ७५ वर्षांवरील जेष्ठ नागरिकांना मोफत प्रवास करता येणार आहे. ही सवलत महाराष्ट्रातील ज्येष्ठ नागरिकांना महाराष्ट्र राज्याच्या हद्दीपर्यंत असणार आहे. औरंगाबाद विभागाचे सोयगाव बस आगार प्रमुख हिरालाल ठाकरे यांनी दिली आहे.

# गरज पडल्यास जमीन विकत घेऊ, पण क्रीडा विद्यापीठ करू : अतुल सावे

## जिल्हा ऑलिम्पिक संघटनेकडून ४५३ खेळाडू, मार्गदर्शकांचा सत्कार; ओलिम्पियन दत्तू भोकनळ यांच्या हस्ते गौरव

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** क्रीडा विद्यापीठ ही मराठवाडा भागाची गरज आहे. त्यामुळे सरकारी जमीन मिळाली तर ठीक अन्यथा जमीन विकत घेऊ पण क्रीडा विद्यापीठ औरंगाबादमध्ये करू, अशी घोषणा राज्याचे सहकारमंत्री अतुल सावे यांनी रविवारी केली. औरंगाबाद जिल्हा ऑलिम्पिक संघटनेतर्फे राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या निमित्ताने ४५३ खेळाडू, क्रीडा शिक्षक, मार्गदर्शकांचा गौरव सावे आणि ओलिम्पियन दत्तू भोकनळ यांच्या हस्ते करण्यात आला.

मेजर ध्यानचंद यांची जयंती तथा राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या निमित्ताने औरंगाबाद जिल्हा ऑलिम्पिक संघटनेतर्फे आंतरराष्ट्रीय-राष्ट्रीय खेळाडू, क्रीडा शिक्षक, मार्गदर्शक यांचा गौरव करण्यात आला. संत एकनाथ रंग मंदिरात रविवारी पार पडलेल्या खेळाडूंच्या या सत्कार सोहळ्याला राज्याचे सहकार मंत्री अतुल सावे, ऑलिम्पियन तथा अर्जुन पुरस्कारार्थी दत्तू भोकनळ यांची प्रमुख उपस्थिती होती. खो-खो खेळाच्या उद्धारासाठी तब्बल पन्नास वर्षे अविरत कार्य करणारे रमेश भंडारी यांना यावेळी मान्यवरांच्या हस्ते जीवन गौरव पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. यावेळी औरंगाबाद जिल्हा ऑलिम्पिक संघटनेचे संघटनेचे अध्यक्ष पंकज भारसाखळे, डॉ.उदय डोंगरे, डॉ.मकरंद जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

क्रीडा विद्यापीठ ही औरंगाबाद तथा मराठवाड्याची गरज असताना हे विद्यापीठ अजून आपल्या भागाला मिळाले नाही. त्यामुळे सरकारी जमीन घेऊन हे विद्यापीठ करू. सरकारी जागा न मिळाल्यास जमीन विकत घेऊ पण हे विद्यापीठ करू अशी अशी घोषणा राज्याचे सहकार मंत्री अतुल सावे यांनी आज या कार्यक्रमात केली. बालेवाडीच्या धर्तीवर उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भ विभागाला ही सुविधा मिळालीच पाहिजे. या क्रीडा विद्यापीठाचे लवकरच भूमिपूजन केले जाईल, असे ते पुढे म्हणाले.



दत्तू भोकनळ यांनी खेळाडूंना मार्गदर्शन करताना सांगितले की, अनेकदा आपण मेहनातीकडे पूर्ण लक्ष देत नाही. मात्र आपल्या भोवती असलेल्या सुविधांकडे जास्त पाहतो. असे न करता आपल्या मेहनतीकडे अधिक लक्ष दिले तर खेळाडूला त्याचा फायदाच होतो.

डॉ. निलेश गाडेकर (सोयगाव), निलेश गायकवाड (पैठण), बाबासाहेब माने (सिल्लोड), विजय बारवाल (कन्नड), भाऊसाहेब खरात (वैजापूर), नामदेव पवार (फुलंब्री), कैलास वाहूळे (औरंगाबाद), राजेंद्र गंगावणे (खुलताबाद), निलेश माने (गंगापूर) यांना आदर्श क्रीडा शिक्षक पुरस्कार देऊन गौरवण्यात आले तर जिल्ह्यातील आंतरराष्ट्रीय खेळाडू : अदिती निलंगेकर (पॅरा ऑलिम्पिक), सृष्टी साठे (सुवर्ण पदक, आशियाई कनिष्ठ बॉक्सिंग), शर्वरी कल्याणकर (सुवर्ण पदक, आशियाई कनिष्ठ बॉक्सिंग), तनिशा बोरामणीकर (रौप्य पदक, आशियाई बुद्धिबळ), गौरव म्हस्के (कांस्य पदक, आशियाई ज्युनियर बॉक्सिंग), कशीष भराड (आशियाई तलवारबाजी), वैदेही लोया (आशियाई तलवारबाजी), साक्षी चितलांगे (रौप्य पदक, आशियाई बुद्धिबळ), तेजस शिरसे (आशियाई अथलेटिक्स स्पर्धा), रिद्धी हत्तेकर, सिद्धी हत्तेकर (आशियाई जिम्नॅस्टिक स्पर्धा), अभय शिंदे (आशियाई तलवारबाजी), श्रेयस जाधव (आशियाई तलवारबाजी), आयर्नमॅन संदीप गुरमे (युरोपिअन चॅम्पिअनशिप) यांच्यासह विविध खेळांतील ४५३ राष्ट्रीय खेळाडू, ५७ क्रीडा मार्गदर्शकांचा देखील मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ.दिनेश वंजारे, विश्वास जोशी, डॉ.अब्दुल कादिर, डॉ.दयानंद कांबळे, डॉ.संदीप जगताप, अमृत बिऱ्हाडे आदींनी परिश्रम घेतले.

# आयर्न मॅन स्पर्धा पूर्ण करण्याचा फिटनेस फर्स्ट इंडिया संस्थेला बहुमान

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** १४ ऑगस्ट २०२२ रोजी आयर्न मॅनने ऑर्गनाईज केलेली प्रतिष्ठेची आंतरराष्ट्रीय स्पर्धा कजाकिस्तान येथे पुण्यातील फिटनेस फर्स्ट इंडिया संस्थेतर्फे पूर्ण करण्याचा बहुमान चार जणांना मिळाला असून त्यात दोन महिलांचाही समावेश आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत पाच स्पर्धकांनी भाग घेतला होता. मात्र चार स्पर्धकच ही स्पर्धा पूर्ण करू शकले. सहभागी स्पर्धक हे विविध क्षेत्रातील व विविध वयोगटातील यशस्वी व मानांकित आहेत, अशी माहिती या स्पर्धेचे प्रशिक्षक विजय गायकवाड यांनी एका पत्रकाद्वारे दिली.

फिटनेस फर्स्ट इंडिया ग्रुप तर्फे प्रशिक्षक विजय गायकवाड यांचे मार्गदर्शन व प्रशिक्षण घेऊन ही स्पर्धा चार स्पर्धकांनी पूर्ण केली. आयर्नमॅन स्पर्धा यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्यांमध्ये स्वानंद देशपांडे व समृद्धी कुलकर्णी तसेच अर्ध आयर्न मॅन स्पर्धेत यश प्राप्त करण्यात सायली गंगाखेडकर व रवींद्र कदम या स्पर्धकांचा समावेश आहे.

क्रीडा विश्वात अत्यंत अवघड मानल्या जाणाऱ्या ज्या विविध स्पर्धा आहेत. त्यात आयर्न मॅन या स्पर्धेचा समावेश केला जातो. मानसिक संतुलन, शारीरिक बळ तसेच आर्थिक तयारी च्या कसोटीची ही अर्ध आयर्न मॅन व पूर्ण आयर्न मॅन असे दोन प्रकारात अशी स्पर्धा घेतली जाते. त्यासाठी ८.३० तास व १७ तास अशी अनुक्रमे काल मर्यादा असूनही या सर्व स्पर्धकांनी उत्तम वेगात ही स्पर्धा वेळेपूर्वी यशस्वीरित्या पूर्ण केली. पुण्यातून निघाल्यावर कझाकिस्तान येथे स्पर्धकांच्या सायकली पोहोचल्या नाहीत. त्यासाठी अनेक प्रयत्न करून अखेर स्पर्धेपूर्वी केवळ ८ तास या सायकली स्पर्धकांच्या हाती लागल्या.

हा तणाव असूनही सर्वांनी स्पर्धा यशस्वीरित्या पूर्ण आयर्न मॅन पूर्ण स्पर्धा करण्यासाठी ३.८०० मीटर पोहणे १८० किलोमीटर सायकलिंग व ४२ किलोमीटर रनिंग असे सलगरित्या केले जाते. आंतरराष्ट्रीय वाटरपोलोचे पूर्वाश्रमीचे कर्णधार स्वानंद देशपांडे यांनी ही स्पर्धा १३.२५.२३ या विक्रमी वेळेत पूर्ण केली. तर समृद्धी कुलकर्णी हिने १४.५६.१६ अशा वेळेत स्पर्धा पूर्ण केली.



अर्ध आयर्न मॅन स्पर्धा ही १.९ किलोमीटर पोहणे ९० किलोमीटर सायकलिंग व २१ किलोमीटर धावणे अशा प्रकारात घेतली जाते ही स्पर्धा रवी कदम यांनी ०८.४२.४५ अशा वेळेत पूर्ण केली. तसेच सायली गंगाखेडकर हिने ही स्पर्धा ०६.२५.२८ या वेळेत पूर्ण केली, तसेच त्यातील ३५.१५ मिनिटे वेळेत १.९ किलोमीटर पोहणे पूर्ण करून दुसरा क्रमांक पटकावला.

स्पर्धकांची पोलादी महत्त्वकांक्षा आणि अथक प्रयत्न व विजय गायकवाड यांचे उत्तम मार्गदर्शन याची उत्कृष्ट सांगड या यशस्वी स्पर्धकांना लाभान्वीत ठरली.

या स्पर्धेसाठी २०१९ पासून प्रशिक्षण व प्रयत्न सुरू होते. तथापि २०२० व २०२१ यावर्षी कोविड महामारीमुळे ही स्पर्धा स्थगित करण्यात आली. तरीही निराश न होता, चिकाटीने व संपूर्ण आत्मविश्वासाने स्पर्धकांनी हे स्वप्न पूर्ण केले. ही स्पर्धा जिंकून अंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची प्रतिष्ठा उंचावली आहे. भारताच्या अमृत महोत्सवी स्वातंत्र्याच्या महोत्सवात मिळालेले हे यश म्हणजे भारतमातेच्या मुकुटावरील मानाचा तुरा आहे हे निश्चित म्हणावे लागेल. त्या विस्तृत स्पर्धा प्रांगणात भारताचा तिरंगा ध्वज फडकविला व राष्ट्रगीत गायनाचा मान मिळाला हा आनंदाचा क्षण अनुभवला असे सर्व स्पर्धकांनी अभिमानाने सांगितले आहे.



# न्याय्य हक्कांसाठी संघटित लढा महत्त्वाचा : मो. आसिफ भाई

आधुनिक केसरी न्यूज

**चिखली :** तालुक्यातील अंगणवाडी सेविका मदतनीसांचे तिसरे तालुका अधिवेशन संघटनेच्या राज्य कौन्सिल मेंबर कॉ.मंदाताई डोंगरदिवे यांच्या अध्यक्षतेखाली रविवार दि.२८ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता पंचायत समितीच्या सभागृहात चिखली येथे आयोजित करण्यात आले होते. या अधिवेशनाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना मो. आसिफ भाई म्हणाले की, आपल्या न्याय हक्कांसाठी संघटित लढा महत्त्वाचा असून संघटनेच्या माध्यमातून सर्वांनी आपला सहभाग नोंदवला पाहिजे.

देशाची सुदृढ पिढी निर्माण करण्याचे काम अंगणवाडी सेविका मदतनीस यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात करण्यात येते असे मत कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष गायकवाड यांनी तिसऱ्या तालुकास्तरीय अधिवेशनात मार्गदर्शन करताना व्यक्त केले. ते पुढे म्हणाले की, या देशात 1975 मध्ये एकात्मिक बाल विकास योजना सुरू झाली. शून्य ते सहा वयोगटातील बालकांना तसेच गरोदर व स्तनदा मातांना पूरक पोषण आहार देऊन त्यांना सुदृढ करण्याचे काम अंगणवाडी केंद्राच्या माध्यमातून केले जाते. परंतु हे प्रामाणिकपणे काम करणाऱ्या अंगणवाडी सेविका मदतनिसांना मात्र अत्यंत अल्प मानधनावर सरकार राबवून घेत आहे. त्यांना कुठल्याही प्रकारची सामाजिक सुरक्षा मिळत नाही. गेल्या 40 वर्षांपासून अंगणवाडी सेविका मदतनीस सीटूच्या नेतृत्वाखाली सरकारी कर्मचाऱ्यांचा दर्जा, पेन्शन, ग्रॅज्युटी इत्यादी आरोग्य सोयी सुविधाचा लाभ मिळावा म्हणून सिटूच्या नेतृत्वात देश पातळीवर संघर्ष करीत आहेत. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात तरी सरकारने त्यांना कायम सेवेत घेऊन किमान वेतन लागू करावे अशी मागणी आजच्या अधिवेशनाच्या निमित्ताने संघटनेचे जिल्हाध्यक्ष कॉ.पंजाबराव गायकवाड यांनी सरकारला केली. तसेच यावेळी तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष इफ्तेखार खान, मुक्त पत्रकार सत्य कुटे, साहित्यिक सुरेश साबळे यांनी आपले विचार मांडले. या अधिवेशनात एक तालुका स्तरीय कमिटीचे गंठण करण्यात आले. या अधिवेशनासाठी चिखली तालुक्यातील मोठ्या प्रमाणात अंगणवाडी सेविका मदतनिसांनी आपली उपस्थित दर्शवली. या अधिवेशनाचे सुत्रसंचालन नंदा शेळके यांनी तर आभार प्रदर्शन कॉ.संगीता मादनकर यांनी केले. संघटनेच्या वतीने सरिता पवार, शैला उबरहंडे, पुष्पलता खरात, नंदा मोरे, संगीता मादनकर, ॲड.विद्या बडुटकर, कल्पना गवई, उर्मिला खेडेकर, विजेता राऊत, शोभा परिहार, मंगलाताई ठेंग, स्नेहलता बोर्डे, वर्षाताई पाटील, सुनिता घाडगे, माया वाघ, प्रतिभा धक्के, अनिता वायाळ, शोभा परिहार, इंदू मोरे, सुनिता घट्टे, विद्या गवई, ज्योती गवई, कांचन गवई, मिनाक्षी बोर्डे, अश्विनी वांजोळ, उषा साळवे इत्यादीनी अधिवेशनासाठी विशेष परिश्रम घेतले.

# कोरोना, असाही येतो उपयोगी

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** दोन वर्षांपूर्वी कोरोनामुळे जगात हाहाकार उडून लाखो लोक यमसदनी गेले, जे वाचले त्यांनी लसीकरण केले म्हणून वाचले असा दावा डॉक्टर करतात पण कोरोना लसीकरणाचे प्रमाणपत्राने एका आजीला त्यांच्या घरी पोहोचण्यास मदत केली. नाव इंदू सोळुंके (७०) रा. खुपरा ता.सेलू या त्याच्या नातीसोबत बाबा पेट्रोल पंप परिसरात आज पहाटे ३.३० वा. पायी फिरत असताना पोलिसांना आढळल्या. त्यावेळी पोलीस आयुक्तालयातील पोलीस उपनिरीक्षक दीपक ढोणे हे गस्तीवर होते.

त्यांनी आजींना एवढ्यारात्री पायी शहरात कुठे फिरत आहात, असे विचारले त्यावर आजींनी पोलिसांना सांगितले की, त्यांना मुलाने गावी जाण्यासाठी पुण्याहून मुलाने जिंतूर बसमध्ये बसवून दिले. पण एस.टी. बस औरंगाबादला आल्यावर फेल झाली त्यामुळे त्या बसमधील प्रवाशांना कंडक्टरने दुसऱ्या बसमध्ये बसवून दिले. या सगळ्या गडबडीत त्यांच्या जवळ प्रवासाचे तिकीट असलेली बॅग रस्त्यात कुठेतरी पडली. नव्या बसमधील कंडाक्टरने आजीकडे तिकीट विचारले असता त्यांना बॅग हरवल्याचे लक्षात आले. त्यांनी कंडाक्टरला तिकीट नसल्याचे सांगताच त्यांना बसमधून उतरवून दिले. म्हणून त्या



पायी-पायी निघाल्या. हा प्रकार ऐकल्यावर पीएसआय ढोणे यांनी आजींना त्याच्या मुलाचा नंबर विचारला आजींनी सगळे नंबर मोबाईलमध्ये आहेत. त्यांना सांगता येत नसल्याचे ढोणे यांना सांगितले. शेवटी ढोणे यांनी आजींची बॅग तपासली असता त्या बॅगमध्ये आजीने कोरोना लसीकरण करवून घेतल्याचे प्रमाणपत्र मिळाले, त्यावर आज्जींचा नंबर होता. त्यानंबरवर ढोणे यांनी फोन लावला असता तो सैन्य भरतीसाठी आलेल्या मुलाने उचलला. पोलिसांनी अधिक चौकशी केली असता त्या मुलाने सांगितले की, त्याला बसस्थानक परिसरात एक बॅग सापडली व त्यामध्ये मोबाईल व आधारकार्ड आहे व तो सैन्यात भरतीसाठी आलेला असून बसस्थानक परिसरात आहे. ढोणे यांनी त्याला तिथेच थांबायला सांगून पथकासहित बसस्थानक परिसरात पोहोचले. त्या मुलाकडून ती बॅग घेत तपासली असता ती बॅग आजींचीच होती. त्या फोन वरून पोलिसांनी त्यांनी आजींच्या मुलाशी संपर्क साधला. घडलेला प्रकार सांगून आजींना त्यांच्या नातीसह जिंतूर गाडीत पहाटे ४ वा. बसवून दिले.



# अंधारात जुना मोंढा की जुन्या मोंढ्यात अंधार ?

## मोबाईल, पाकिटांसह महिलांचे दागिने चोरट्यांसाठी बाजाराचे खुलेद्वार....! बाजारातील विद्युत रोषणाई अल्पकालावधीतच गुल्ल

आधुनिक केसरी न्यूज

**पुर्णा :** शहरातील मुख्य बाजार पेठेतील मध्यभागी असलेला जुना मोंढा परिसरात दररोज भाजीपाला/फळांचा बाजार भरतो तर दर सोमवारी मोठ्या प्रमाणात आठवडी बाजार भरत असतो. त्यामुळे नगर परिषद प्रशासनाने या परिसरात पावसाळ्यात चिख्खल होऊ नये याकरीता परिसरातील सर्वच भाग सिमेंट कॉंक्रेट केलेला असून या संपूर्ण मोंढा परिसरात लाखों रुपये खर्चून महागडे असे मोठमोठे विद्युत पोल बसवून सर्वच परिसरात विद्युत रोशनाई केली होती. त्यामुळे या परिसरात सायंकाळी जवळजवळ रात्री उशिरा पर्यंत भाजीपाल्यासह फळांचा बाजार भरतो. परंतु मागील अनेक दिवसापासून या परिसरातील पोलवरील जवळपास सर्वच लाईट बंद झाल्यामुळे या परिसरातील बाजारात सायंकाळी अक्षरशः अधार होत असल्यामुळे पाकीट मोबाईलसह दागिने पळवण्याचे प्रकार घडताना पाहावयास मिळत आहेत.



शहरातील अत्यंत गजबजलेला परिसर असलेला हा जुना मोंढा परिसर दररोजच्या बाजारासह दर सोमवारी भरणाऱ्या आठवडी बाजारामुळे या परिसरात नगराध्यक्षा गंगाबाई एकलारे व त्यांचे प्रतिनिधी तथा मा.नगरसेवक संतोष एकलारे यांनी या परिसरात तब्बल १६ ते १८ मोठे विद्युत पोल बसवून संपूर्ण परिसरात लाखो रुपयांची विद्युत रोशनाई केली खरी परंतु नगराध्यक्ष एकलारे यांचा कार्यकाळ संपल्यानंतर नगर परिषदेवर प्रशासक म्हणून सुधीर पाटील यांची नेमणूक करण्यात आली. प्रशासकांच्या नियुक्तीनंतर नगर परिषद प्रशासन संपूर्णतः सैरभैर झाल्याचे निदर्शनास येत असून प्रशासक पाटील यांची नगर परिषद प्रशासनावर मजबूत पकड नसल्यामुळे व मुख्याधिकारी अजय नरळे यांचे ही शहरातील नागरी सुविधांकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे आरोग्य व स्वच्छता विभाग, बांधकाम विभाग वसूली विभाग, पाणीपुरवठा विभाग, स्वच्छता विभाग आदी कुठल्याही विभागावर नियंत्रण नसल्यामुळे शहरात सर्वत्र नागरी सुविधांचा अभाव निर्माण झाला असून शहरातील प्रमुख मार्गांवरील पथ दिव्यांसह जुना मोंढा परिसरातील लाखों रुपयांच्या विकासनिधीतून बसवण्यात आलेल्या सर्वच पोलवरील पथ दिवे बंद झाल्यामुळे व याकडे मुख्याधिकारी अजय नरळे व नगर प्रशासनाचे सपशेल दुर्लक्ष होत असल्यामुळे या परिसरात सायंकाळच्या सुमारास सर्वत्र काळाकुट्ट अंधार पसरत असून त्यामुळे चोरटे दिवसा छुपके छुपके तर सायंकाळ नंतर उघडपणे बाजारासाठी येणाऱ्यांच्या खिश्यातील पाकीट महागडे मोबाईल महिलांचे दागीने यावर डल्ला मारत आहेत याही पेक्षा गंभीर बाब म्हणजे परिसरात पसरलेल्या अंधारात फिरणारी असंख्य मोकाट जनावर गाढव या जुना मोंढा भागात सैराट होऊन अक्षरशः एकमेकांच्या माग धावपळ करीत गोरगरीब फाजीपाला विक्रेत्यांच्या भाजीपाल्यासह व फळ विक्रेत्यांच्या फळांवर देखील तुटून पडत असल्यामुळे परिसरात सर्वत्र गदारोळ माजत आहे. त्यामुळे 'अंधारात जुना मोंढा बाजार की जुन्या मोंढ्यातील बाजारात अंधार ? मोबाईल पाकीटांसह महिलांचे दागीणे चोरट्यांसाठी नगर परिषद प्रशासनाने जनुकाही खुले केले द्वार अशी एकंदर परिस्थिती झाल्याचे दिसत आहे.



# देशस्थ ऋग्वेदी समाज मंडळातर्फे माझा बाप्पा स्पर्धेचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** काल देशस्थ ऋग्वेदी समाज मंडळ संभाजीनगर आयोजीत माझा बाप्पा स्पर्धा घेण्यात आली. आपले दैवत भगवान श्री परशुराम व आपले संस्थापक अध्यक्ष आणि आमचे प्रेरणास्थान स्व.शंतनु चौधरी दादा यांच्या प्रतिमेस पुष्पहार आणि दीपप्रज्वलन करून शाडु मातीपासुन पर्यावरण पूरक श्री गणेशाची मूर्ती बनवण्याची कार्यशाळा कलश मंगल कार्यालय येथे उत्साहपूर्वक पार पडली.
त्यात प्रशिक्षक श्रीकांत कडेपुरकर यांनी प्रशिक्षण दिले. त्यांच्यासोबत त्यांच्या ३ विद्यार्थीनींनी सर्वांना गणपती तयार करण्याचे प्रशिक्षण दिले. आपल्या स्पर्धेमध्ये ३ गट तयार करून प्रत्येक गटांना प्रथम, द्वितीय, तृतीय, असे बक्षीस वस्तू स्वरूपात देण्यात आल्या. बक्षिसासाठी मंडळाचे पदाधिकारी पंडित पैठणीचे रविंद्र पंडीत मार्फत आणि ऐ स्केअर क्लासेस आयआयटी फाऊंडेशन च्या अंतारा बॅनर्जी, मंडळाचे पदाधिकारी रमेश एकबोटे यांनी योगदान दिले. सर्वच वयोगटातील स्पर्थकांनी उत्तम अशा श्रींची मूर्ती घडवल्या, नाते मनाचे वधुवर सूचक संस्थेच्या संचालिका आणि देशस्थ ऋग्वेदी मंडळाच्या महिला पदाधिकारी मोनिकाताई शंतनु चौधरी तर्फे सर्वांना उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात आले तसेच सर्व स्पर्धकांना विद्यार्थी, विद्यार्थींनीला मंडळातर्फे प्रशस्तीपत्र देण्यात आले.
उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्रकल्प प्रमुख वैभव देशपांडे, रवींद्र पंडित, मोनिका चौधरी, मयुरी दाभाडकर, रंजना समाज, अंजुषा कुलकर्णी तसेच कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी नरेश जोशी, रवी जेउरकर, अनंत कुलकर्णी, प्रशांत दाभाडकर, अंबादास कुलकर्णी, श्रीपाद मुगुटे, मिलिंद दाभाडकर, नरेश पटवर्धन, पद्माकर कोटचिरकर, मानसी दाभाडकर यांनी योगदान दिले.

# ताडकळच्या 'त्या' रहिवाशांचा आ.डॉ.गुट्टेंच्या समोर टाहो

आधुनिक केसरी न्यूज

**पूर्णा :** तालुक्यातील ताडकळस शहरातील गट नं.३१२ मधील सैनिक व बाळराज नगरच्या तब्बल १७७ रहिवाशांना पूर्णाच्या प्रशासनाने म.ज.म. अधिनियम १९९६ कलम ५० नुसार अतिक्रमण खाली करण्याची नोटीस देऊन ७ दिवसांची मुदत दिली आहे. त्यामुळे हवालदिल झालेले रहिवाशी घाबरले आणि त्यांनी हा सगळा प्रकार आ.डॉ.रत्नाकर गुट्टे यांच्या कानावर घातला. त्यानंतर परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन आ.डॉ.गुट्टे यांनी तातडीने ताडकळस येथे जाऊन 'त्या' नोटीस धारकांची प्रत्यक्ष भेट घेतली. नोटीस बघितली. लोकांची आस्थेने विचारपूस केली. वस्तुस्थिती समजून घेतली. याप्रसंगी 'त्या' रहिवाशांनी पाणावलेल्या डोळ्यांनी आपल्या व्यथा आणि वेदना आ.डॉ.गुट्टे यांच्या समोर मांडल्या. ताडकळस येथील सैनिक नगर व बळराज नगर मधील रहिवासी गेल्या ४० वर्षापासून तेथे राहात आहेत. दरम्यानच्या काळात ग्रामपंचायतने 'त्या' सर्व घरांची कायदेशीर नोंद करुन संबंधित घरांची कर वसुली सुद्धा केली आहे. तसेच 'त्या' सर्व घरांना नियमानुसार वीज, पाणी, रस्ते, आरोग्य सेवाही उपलब्ध झाल्या आहेत. तसेच हे सर्व नोटीस धारक वर्षानुवर्षे कर सुध्दा भरीत आहेत. मात्र तरीही तब्बल ४० वर्षानंतर तहसील कार्यालयाने त्यांना नोटीस दिल्यामुळे रहिवाश्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. त्यामुळे घाबरलेल्या रहिवाशांना आ.डॉ.रत्नाकर गुट्टे यांनी भेटून



दिलासा दिला अन घाबरु नका, तुमच्या घराच्या वीटालाही कुणाला हात लाऊ देणार नाही, असे आश्वासन दिले. पुढे बोलताना आ.डॉ. रत्नाकर गुट्टे म्हणाले की, तुम्ही गेली ४० वर्ष इथे राहात आहात. तुमच्या घराची नोंद ग्रामपंचायतला आहे. तुम्ही महसूल कर सुध्दा वर्षानुवर्षे भरत आहात. त्यामुळे हि जागा आणि घरे तुमच्या हक्काची आहेत. तुमच्या हक्काची लढाई यशस्वी करण्यासाठी मी तुमचे आधारकार्ड, घराचे फोटो, मिळालेली नोटीस, भरलेल्या टॅक्स पावत्या, लाईटबील, निवेदन घेऊन तातडीने मुंबईत जाऊन महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांची भेट घेतो आणि प्रश्न निकाली काढतो. आ.डॉ.रत्नाकर गुट्टे यांच्या आश्वासनाने 'त्या' नोटीस धारक रहिवाश्यांना हत्तीचं बळ मिळाले. आणि उपस्थित माय-माऊंल्याच्या डोळ्यात आनंदाश्रू उभे राहिले.

**अंकिताबाई आणि सुशीलाबाईंच्या बोलण्याने आमदारांचेही डोळे पाणावले...**

'सायब, व्हती तेवढी कमाई खर्चून घर केलंय अन आता हि कागुद आलाय आता तान्हुली लेकरं घिवून कुटं जायाचं' अस रडत-रडत सांगणाऱ्या सुशीलाबाई मगरे आणि 'नाय तर आमाला जीवचं द्यावा लागल' असं म्हणाऱ्या अंकिताबाई कानडे यांचा भावनिक टाहो ऐकूण आ.डॉ.रत्नाकर गुट्टे यांचेही डोळे पाणावले होते.

**यांनीही मांडला आक्रोश...**

याप्रसंगी डॉ.त्रैलोकचंद्र महाजन, स्वातंत्र्यसैनिक पन्नालाल मुंदडा, बबनराव अवतरे, कैलास जाधव, नजीर पठाण, संदीप खंदारे, अंकिताबाई कानडे, सुशीलबाई मगरे, विठ्ठल घोडके, रुजू घोडके, सतीश अंभोरे, शेख ईनुस यांनीही पाणावलेल्या डोळ्यांनी आपला आक्रोश मांडला.
यावेळी पूर्णा तालुकाध्यक्ष गणेश कदम, प्रभारी कैलास काळे, सुभाषराव देसाई, तालुकाध्यक्ष जगन्नाथ रेनगडे, सुदाम वाघमारे, मारोती मोहिते, नवनाथ भुसारे, वेंकटेश पवार, शिवाजी अवरगंड, दिनेश दुधाटे, कैलास शिंदे, मारोती मोहिते, उद्धव शिंदे, मारोती अण्णा मोहिते, दत्तराव पौळ, उत्तमराव अंभोरे, श्रीनिवास सूर्यवंशी, शेख इस्माईल, जगन्नाथ सलगर, कृष्णा शिंदे, रंगनाथ शिंदे, प्रल्हाद कोळेकर यांच्यासह मित्रमंडळ व रासप चे कार्यकर्ते व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# सिल्लेगाव पोलिसांनी तलवार घेऊन फिरणाऱ्यांना केले गजाआड

आधुनिक केसरी न्यूज

**सिल्लेगाव :** आज रोजी बीट अमलदार पवार यांना माहिती मिळाली की, मालिवडगाव येथील इसम संतोष साहेबराव सुरासे, सचिन सोपान गायकवाड यांचेकडे तलवार असून ते गावात फिरत आहेत. अशी माहिती मिळताच तत्काळ पोलिसांनी सदर इसम यांना ताब्यात घेतले असता त्यांच्याकडे एक तलवार मिळून आली आहे. गुन्हा नोंद करून अटक केली आहे. सदरची कारवाई मनिष कलवानिया पोलिस अधीक्षक, डॉ. पवन बनसोडे अप्पर पोलिस अधीक्षक, प्रकाश बेले, Sdpo गंगापूर यांचे मार्गदर्शनाखाली, एम.टी. सुरवसे, पोलिस निरीक्षक, युसुफ शेख, संतोष पवार, अर्जुन तायडे, सुरेश भिसे, राजू निसरगे सर्व पोलिस स्टेशन सिल्लेगाव यांनी केली आहे.


काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in


# सुखी जीवनाचा मंत्र





डॉ. विजय दहिफळे

## चॉकलेट- व्हेलेंटाईन डे - PEA

आधुनिक केसरी

**पुरुषांने स्त्रीला चॉकलेट भेट देण्याचं हे गूढ काय आहे ?**
तर हे रोमँटिक गिफ्ट आणि स्वीट आहे. ज्यामध्ये भरपूर प्रमाणात PEA असते. म्हणून प्रेमात पडण्यास हे मदत करते. पण अति तिथे माती म्हणतात तसे, जास्त चॉकलेट खाल्ले तर डोकेदुखी होते. चॉकलेटप्रमाणे स्ट्रॉबेरी आणि मसाल्यांच्या पदार्थांमध्येही PEA असते.

**फिमेल सेक्स हार्मोन्स म्हणजे काय?**
आता जाणून घेऊया स्त्री शरीरातील हार्मोन्सबद्दल. स्त्री जेव्हा वयात येते तेव्हा तिच्या शरीरात अनेक बदल घडतात. जसे की मासिक पाळी येणे, बीजांड व अंडाशय तयार होणे, शरीरात लव येणे, स्तनांची वाढ होणे. अशी शारीरिक बदलांबरोबरच याकाळात स्त्रिमध्ये मानसिक बदलही घडत असतात. यामागे कारण असतात ते हार्मोन्स. स्त्रियांमध्ये इस्ट्रोजन, प्रोजेस्टेरॉन, टेस्टोस्टेरॉन, प्रोलॅक्टिन, सिरम एफ.एस.एच., सिरम एल.एच. असे हार्मोन्स असतात. टेस्टोस्टेरॉन हे पुरुष हार्मोन आहे. मात्र तरीदेखील ते स्त्रीमध्ये आढळते आणि त्याला कारण आहे बीजांड (ओव्हरीज) तयार करण्याची प्रक्रिया. तसेच इस्ट्रोजन तयार करण्यासाठी सुद्धा त्याचा वापर होतो. याचं स्त्रीशरीरातलं प्रमाण जर जास्त असेल तर ते उत्तेजना वाढवतं म्हणून ते रजोनिवृत्तीनंतर याची मात्रा कमी झाल्यामुळे भावनादेखील कमी होतात. पाळी गेल्यानंतर अनावश्यक केस आणि आवाजात बदल होणे या गोष्टी घडतात. लेझर शस्त्रक्रियेच्या माध्यमातून यावरही उपाय आहेच.

**इस्ट्रोजनचं स्त्री शरीरातलं कार्य काय असतं?**
इस्ट्रोजन नावाचे हार्मोन मासिक पाळी, अंगाची वाढ व गर्भाशयाची वाढ करुन त्याला जनन प्रक्रियेसाठी क्रियाशील बनवते. रजोनिवृत्ती जवळ आली की इस्ट्रोजन कमी होत जातात. आणि हळूहळू पाळी बंद होते. यामुळे कोरडेपणा, भावना कमी होणे या गोष्टी होतात आणि त्यामुळे स्त्रियांना चिडचिड होणे, निद्रानाश, मानसिक तणाव, अशा समस्यांना सामोरे जावे लागते. म्हणून हार्मोन्सचे संतुलन योग्य राखणे अत्यंत महत्त्वाचे असते.
आता समस्या स्त्री शरीरातली इस्ट्रोजनची पातळी कमी झालीच तर यावर इस्ट्रोजन व प्रोजेस्टेरॉन थेरपीचा उत्तम पर्याय उपलब्ध आहे आणि तो करुन घेणे तितकेच महत्त्वाचे आहे. कारण या हार्मोनची पातळी कमी होण्याचा आणि लैंगिक भावनांशी थेट संबंध आहे. अंगातला कोरडेपणा घालविण्यासाठी विविध क्रीम्स, गोळ्या उपलब्ध आहेत. रजोनिवृत्तीनंतर भावना पुनरुज्जीवित करण्यासाठी टेस्टोस्टेरॉन थेरपी उपलब्ध आहेच. त्याचा लाभ करुन घेता येईल.

संपर्क : डॉ. दहिफळे युरॉलॉजी ॲण्ड प्लास्टीक सर्जरी हॉस्पीटल, जिल्हा न्यायालयासमोर, अदालत रोड, बाबा पेट्रोल पंपाजवळ, औरंगाबाद, मोबा. : 9822326248, फोन 0240-2364858
Email : drvijaydahiphale@gmail.com,
Website : www.dahiphalecosmeticurology.com